श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ३ रें.] भाद्रपद शके १८४७ [अंक ६ वा.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादक:—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ... ३०३-३०५
स्फुट विषय ... ... ... ... ... २५७-२६०
श्री साईसच्चरित ... ... ... ... ५३१-५६०


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची कमाई व खर्चवेच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्या-मधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत कर-णाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पड-तील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केलीं तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.


गोविंद रघनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफिस ५ सेंट मार्टिन्सरोड, वांद्रें बी. बी. सी. आय. रेल्वे.


## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीऑर्डरनें अगाऊ रु. ३।=व्ही. पी. नें रु. ३।। चालू अंक -।= मागील अंक शिल्लक असल्यास -।।

पूर्वीच्या अंकात व्ही. पी. नें रु. ३।।= चुकून छापलें गेलें. असेंच यंदा ज्या कांहीं वर्गणीदाराकडे रु. ३।।। ची व्ही. पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचे-कडें जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

शके १८४७ वैशाख व ज्येष्ठाचा जोड अंक नं. २-३ आणि आषाढचा अं. ४ यांत श्रीसाईबाबांच्या छापलेल्या फोटोच्या कांहीं प्रतीसाठीं मागणी आल्यावरून त्या प्रत्येक फोटोच्या ५०० प्रती छापवून तयार आहेत. ज्या कोणास त्या संग्रहीं ठेवण्याची इच्छा असेल त्यानें प्रत्येक प्रतीसाठीं ८२ चीं तिकीटें व आपला पत्ता पाठवावा म्हणजे हे फोटो त्यांजला ब. पो. नें पाठविण्यांत येतील.

# शुद्धिपत्र भाद्रपद शके १८४७ चे ६ वे अंकाचें

| | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| कव्हर पृ० १ | वर्ष १ लें | वर्ष ३ रें |

## महाराजांचे अनुभव

| | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| पृ० ३७९ ओळ २४ | सन्याशी | सन्यासी |
| ३८० ,, ६ | बाबांच्या | बाबांचे |

## स्फुट विषय

| | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| पृ० २४९ शेवटची ओळ | याज | व्याज |
| २५३ ओळ ८ | रुमाला | रुमाल |
| ,, ,, १६ | कडून | काढून |
| २५४ ,, ९ | त | ते |
| ,, ,, १९ | च | चे |
| २५५ ,, १५ | गले | गेले |
| २५९ ,, ४ | हास्यमि | हास्यानि |
| ,, ,, १४ | ह | हे |

## श्रीसाईसच्चरित अ० ३२वा

| | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ओवी १९ | ससार | संसार |
| २९ | कीडा | क्रीडा |
| ४३ | तयां स्वप्नींही | तयां न स्वप्नीही |
| ४७ | पुस | पुसे |
| ५६ | दावाया | दावावा |
| ६१ | तषेनें | तृषेनें |
| ६६ | गुरुरान | गुरुराय |
| १४३ | आल्याला | आपुल्याला |
| पृ० ५५० शेवटची ओळ | सद्गरू | सद्गुरू |
| | भवत | भवतु |

3५२



श्रीसाईबाबा मशिदींतून लेंडीवर जात असतांनाचा देखावा.

## डॉक्टर हरी बापुराव शिरसाठे यांचा अनुभव

ता० ३१।७।२५

॥ श्री सद्गुरु साईनाथबाबा प्रसन्न ॥

धांवुनि भक्तव्यसन हरीसी दर्शन देसी त्याला हो ॥

तीन महिन्यापूर्वी माझ्या कुटुंबाच्या खाण्यांत जोंधळयाच्या लाह्या आल्या त्या बऱ्याच खाण्यांत आल्यामुळें दुसऱ्या दिवशीं जुलाब व वांत्या होऊं लागल्या. अजीर्णामुळें हें झालें असेल असें समजून तिनें एक दिवस लंघन केलें. परंतु त्यानें कांहीं एक फायदा न होतां उलट दुसऱ्या दिवशीं हातांपायांवर व तोंडावर सूज आली.व संध्याकाळपासून साऱ्या अंगाचे सांधे दुखूं लागले. शेकणें वगैरे उपाय केले, परंतु कांहींएक फायदा न होतां प्रकृति जास्त बिघडली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी अंथरुणावर देखील ह्या अंगावरून त्या अंगावर होतां येईना. कर्मधर्मसंयोगानें माझे एक डॉक्टर मित्र त्याच दिवशी तेथें आले व त्यांनीं प्रकृती पाहुन पोटांत घेण्यास व सांध्यांवर चोळण्यास अशा दोन तऱ्हेचीं औषधें पाठवून दिलीं. औषधें आलीं त्यावेळेस गुरुमूर्ती काशिनाथमामा दुबे हे तेथें होते, त्यांनीं सांगितलें "औषध देऊं नका. नुसतें बाबांचें तीर्थ पोटांत देत जा व उदी अंगास लावीत जा. त्या योगानें आराम पडेल." त्यांनीं सांगितल्याप्रमाणें दिवसांतून एक दोन वेळां उपचार घरांतील मंडळींनीं केला. नित्यनेमाप्रमाणें तो गुरुवारचा दिवस असल्यामुळें मी गुरुमूर्ती काशिनाथमामांच्या घरीं बाबांच्या भजनासाठीं गेलों. पहाटे ३ वाजतां परत आल्यावर समजलें कीं कुटुंबाची प्रकृती रात्रीं १२ वाजल्यापासून फारच बिघडून जीव घाबरा होऊं लागला आहे. हें समजल्याबरोबर मी बाबांची उदी घेऊन तिचे अंगास "गुरु माउली धांव व भक्ताचें संकट निवारण कर" असें म्हणून मोठ्या भक्तीनें व प्रेमानें लाविली. तीर्थ व उदी पिण्यास दिली. महदाश्चर्याची गोष्ट ही कीं जिला दोन दिवसांपासून उठवत व बसवत नव्हतें ती उदी लाविल्यापासून दोन मिनिटांतच एकदम अंथरुणावर उठून बसली व खाण्यास मागूं लागली. पहाटेस स्वप्नामध्यें बाबांनीं तिजला दर्शन देऊन सांगितलें कीं,"माझे ठिकाणीं पूर्ण निष्ठा ठेवून सबूरी धर तुला सुख होईल."

दुसरे दिवसापासून कोणतेही औषधोपचार न करितां मुलाची प्रकृति सुधारत चालली. एकाच वेळीं बाबांनी आपल्या अतर्क्य लीलेनें गुरुवर्य साई-नाथ मामांचा शब्द खरा करून माझ्या हातास यश देऊन एकनिष्ठा ठेव-ल्यास कसा चमत्कार होतो हें दाखवून कुटुंबाची निष्ठा दृढतर करण्यास दर्शन देऊन आशिर्वाद दिला. असे अनेक अनुभव माझी गुरुमाउली मजला वारंवार दाखवीत आहे.

**जैसी जयाची दर्शनोत्कंठा। जैसा भाव जैसी निष्ठा॥**
**सानंदानुभव पराकाष्टा। दासानुदासा लाधली॥**

(२) माझी बदली पुण्याहून धुळ्यास झाली. धुळ्यास येण्यापूर्वी थोडे दिवस अगोदर मुलीच्या लग्नासाठीं रजा घेतली होती. पुण्याहून निघण्याचे वेळी मी आमच्या साहेबाच्या ऑफिसांत विचारपूस केली कीं मजला आठ दहा दिवसानंतर चार पांच दिवसांची रजा मिळेल काय? परंतु इतक्या लव-कर पुन्हा रजा मिळणें शक्य नाहीं असें सांगण्यांत आलें. माझा संकल्प शिरडीस जाऊन बाबांचें दर्शन घेण्याचा झाला होता व त्याप्रमाणें मी रोज बाबांचे तसबिरीपुढें हात जोडून प्रार्थना करीत असे कीं, "गुरुपौर्णिमेस मजला शिर्डीस घेऊन जा." रजा मिळणार नाहीं असें खात्रीलायक समज-ल्यावरून मी रजेचा अर्ज अगाऊ केला नव्हता. तारीख २९ माहे जून १९२५ सोमवार रोजीं पहाटे पांच वाजतां श्रीसमर्थ साईबाबा यांनी स्वप्नांत दर्शन देऊन मजला सांगितलें कीं "तूं शिर्डीस गुरुपौर्णिमेसाठी ये. दुसरी कोणतीही काळजी करूं नकोस" नंतर मी रिप्लाय पेड तार करून पांच दिवसांची रजा मागितली व ती श्रीसाईनाथ कृपेनें मिळाली. यावरून बाबा आपल्या पूर्ण भजनी लागलेल्या भक्तांचे मनोरथ कसे पूर्ण करितात व त्यांस कसे सौख्यानंदानुभव देतात हें दिसून येईल.

३ शिर्डीहून परत निघण्याचेपूर्वी एक दिवस मी मशिदीमध्यें बाबांचे दर्शनास गेलों असतां तेथें म्हाळसाबाई म्हणून बाबांची एक फार जुनी, एक निष्ठ व निस्सीम भक्तीण आहे ती बसली होती. तिनें मजला पाहिल्याबरोबर आशिर्वाद देऊन कांहीं पैसे मागितले. मी थोडे पैसे दिले तरी ती जास्त

मागूं लागली. मी तिला सांगितलें कीं, मी उद्यां जाणार आहें, त्यावेळीं देईन. मी निघतेवेळीं ती बाई माझ्या टांग्यासमोर आली व पैसे मागूं लागली मला निघण्यास उशीर झाल्यामुळें मी गडबडींत होतों व आदल्या दिवशीं त्या बाईस पैसे देईन म्हणून सांगितलें होतें त्याची आठवण न राहून तिला पैसे न देतां उलट म्हणालों कीं "तीन तीनदां पैसे कसले मागतेस" इतक्यांत आमचा टांगा चालू झाला. तो टांगा कोपरगांवापर्यंतचा होता. तेथून दुसरा टांगा करून मजला स्टेशनवर जाण्याचें होतें. कोपरगांवीं मी रात्रीं बारा वाजतां पोंचलों. स्टेशनवर जाण्यास टांगे पाहिले परंतु एकही टांगा मला मिळाला नाहीं. त्यावेळीं मजला तेथें बराच त्रास होऊन दुसरे दिवशीं ४ वाजतां गाडी मिळाली.

मी मनांत विचार करूं लागलों कीं, आजपर्यंत बाबांच्या कोणत्याही भक्ताला प्रवासाचा त्रास झालेला ऐकण्यांत नाहीं व मला बाबा वारंवार प्रेमाचे सौख्यदायक अनुभव दाखवित असतां ह्या वेळेस त्यांच्या सेवेंत कांहीं-तरी कमतरता झाली असेल किंवा कांहीं चूक झाली असेल म्हणून मला असा त्रास सोसावा लागला. मी पुष्कळ विचार केला, परंतु ती चूक माझ्या ध्यानांत येईना. कोपरगांव स्टेशनावर मजला गाडींत बसण्यास जागा मिळेना. शेवटीं गाडी हलतांना मी सेकंड क्लासच्या डब्यांत जाऊन बसलों. मनमाड स्टेशनवर गाडी येऊन उभी रहातांच तिकीट कलेक्टरनें आमचा डबा उघडून सर्वांचीं तिकिटें तपासलीं, परंतु बाबांची अगाध करणी कीं त्यांनीं मला मुळींच तिकीट विचारलें नाहीं. मनमाड स्टेशनावर रा. पुरुषोत्तम बिहारी-लाल व्यास व मी एका डब्यांत बसलों रा. पुरुषोत्तमराव व्यास यांनीं वडील गुरुबंधु या नात्यानें मला फार उत्तम उपदेश केला. व आपला एक चमत्कारिक अनुभव सांगितला. तो असा:—" आज मी शिर्डीहून निघतांना वेडसर म्हाळसाबाई कांहीं पैसे मागण्यास माझ्या अगदीं जवळ आली, त्या वेळेस कांहीं गलिच्छ व घाणेरडी अशी तिच्या कपड्यांची घाण आली व माझ्या मनांत किळस उत्पन्न झाली. तिला मी कांहीं पैसे दिले. तिनें कांहीं आशिर्वादात्मक शब्द बोलून जेव्हां माघारी फिरली तेव्हां तिच्या फिरण्यासरशीं

जी एकदम वाऱ्याची झुळक आली ती सुवासिक मोगऱ्यांच्या फुलांच्या परिमळानें मिश्रित असल्यासारखी होती. बाबांच्या त्या लीलेनें माझें मन आनंदानें ओतप्रोत भरून येऊन माझ्या डोळ्यांतून प्रेमाश्रु आले." इतकें ऐकल्याबरोबर आदल्या दिवशीं त्या म्हाळसाबाईची अवहेलना मी केली व त्या योगानें प्रवासांत मला त्रास झाला हें मनांत एकदम येऊन मला माझ्या कृत्याबद्दल पश्चात्ताप झाला व बाबांच्या लीलेचें कौतुक वाटलें. झालेली सर्व हकीकत व्यास बाबूंस सांगितली. माझा पुढील सर्व प्रवास फारच सुखावह होऊन मला कोणताही त्रास झाला नाहीं. या अनुभवानें मला असें शिकविलें कीं बाबा निस्सीम व प्रेमळ भक्तीचे भुकेले आहेत. त्यांचे जवळ राव व रंक हा भेद नाहीं. त्यां अप्रबुद्ध पामरानें एका अशा भक्ताची अवहेलना केली म्हणून मजला शिकवणूकीसाठीं हा अनुभव दाखविला व माझी चूक पदरांत घालण्यासाठीं व्यास बाबूंस स्वतःचा अनुभव सांगण्यास स्फूर्ती दिली. बाबांची अगाधलीला व भक्ताचे ठायीं असलेलें अलौकिक प्रेम पाहून मन आश्चर्यानंदांत तल्लीन होऊन जातें.

(४) माझें कुटुंब मंगळवार तारीख २१माहे जुलै सन १९२५ रोजी पहाटेस प्रसूत झालें. बाबांची पूजा व भजन करण्यास कोणत्याही तऱ्हेचा विटाळ वगैरे नसतो असें ऐकण्यांत मागें आलें होतें म्हणून मी वृद्धी न पाळतां बाबांचें पूजन व भजन रोजच्या पाठाप्रमाणें सुरू ठेविलें. रात्रीं बाबांची शेजारती करण्यापूर्वीं माझ्या कुटुंबास थोडी झोंप लागली. झोपेंत एक स्वप्न पडून त्यांत एक दिव्य मूर्ती हातांत कमंडलू, एक सोटा व लंगोटी लाविलेली अशी आली. त्यां ठिकाणीं स्त्रीपुरुषांचा बराच समुदाय होता. माझ्या कुटुंबाकडे वळून त्या मूर्तीनें तिचे डोक्यावर हात ठेविला व सांगितलें कीं "तुम्हां सर्वांचें चांगलें होईल. परंतु तुम्ही जो आज अत्याचार केला तो मजला व बाबांना खपत नाहीं." इतकें म्हणून ती मूर्ती जवळच पाण्याचा ओघ होता तिकडे चालली. तिच्या पाठीमागें सौभाग्यवती चालली असतां ती मूर्ती अदृश्य झाली. व सौभाग्यवती झोंपेतून जागी झाली ती मी शेजारती करण्यासाठीं घंटा वाजवूं लागलों त्या योगानें जागी झाली, त्याबरोबर तिनें

निरोप पाठविला की शेजारती करूं नका, वृद्धीपाळा. नंतर तिनें स्नान सांगितलें. दुसरे दिवसापासून ब्राह्मण करून पूजा वगैरे करवून घेऊं लागलों. बाबा आपल्या भक्तांच्या चुका अशा रीतीनें त्याच्या पदरांत घालून त्यास क्षमा करून सन्मार्गास लावतात. बाबांनी मजला पदरांत घेतल्यापासून वारंवार असे उपदेशपर दृष्टांत देऊन या गरीब दासानुदासाची भक्ती दृढ करून त्याची अल्पसेवा मान्य करून घेतात हें पूर्व जन्मीचें सुकृत होय असें वाटतें.

बाबांचा एक अतिनम्र दासानुदास.

## रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल बी. ए. एल्. एल्. बी. सालिसीटर यांनी पाठविलेले श्रीचे कांहीं अनुभव.

॥ भक्तनके काज प्रभु सगुणधारी ॥

निर्गुण निराकार परब्रह्माला भक्त किंवा अज्ञजनांकरितां रुपारंगाला यावें लागतें. जेव्हां जेव्हां तें परब्रह्मस्वरुप आकार वा देह धारण करितें, तेव्हां तेव्हां त्या देहाचा प्रत्येक व्यापार भक्ताकरितां पूर्ण बोधांनी भरलेला असा असतो. त्याचें बोलणें, स्पर्श करणें पहाणें, चाखणें, हुंगणें, हें सर्व निरर्थ नसून त्या सगळ्यांतून कांहीं ना कांहीं बोध घ्यावयाचा असतो; व प्रेमळ भक्त व खरे मुमुक्षू तो घेतच असतात. असा ह्या वेडया प्राण्याचा कसा तरी समज झाला असल्यामुळें त्यानें एकदां बाबांच्या प्रत्येक ( दृश्य ) व्यापाराविषयीं विचार करण्याचा आरंभ केला, व त्यावेळेस त्याचे मनांत जे विचार सुचले त्याची मांडणी भक्तजनांच्या आल्हादाकरितां तो सादर करीत आहे.

बाबांच्या बोलण्याविषयीं तर कांहीं फार विचार करण्याची गरज पडलीच नाहीं. कारण बाबा कधीं मिथ्या भाषण करीत नसत. त्यांचें बोलणें अगदींच नेमकें व त्यांतील प्रत्येक वाक्य तेथें हजर असलेल्या मंडळीपैकीं कोणा ना कोणाला तरी उद्देशून निघालेलें असे.

त्यांचे तोंडची शिवीगाळी देखील प्रस्तुत लेखकाला निरर्थक वाटली नाहीं. बाबांच्या भाषेचा बहुतेक अर्थ बहुतेक स्थूल व्यवहाराला उद्देशून

नसून सूक्ष्म देहाचे व्यापारसंबंधानें असे, अशी माझी समजूत असल्यामुळें कोणाच्याही आईला शिवी दिली म्हणजे ती अर्से समजत असें कीं ही शिवी त्याच्या अविद्या व अज्ञानरूपी आईला आहे, त्याला नाहीं.

कधीं कधीं बाबा प्रत्यक्ष रीतीनें कोणाचाही उद्देशून शिवीगाळी न करितां ती मोघमपणेंच करीत होते. मग त्याचें कारण काय ? असा प्रश्न उद्भवल्यास त्याचें समाधान इतकेंच कीं त्या शिव्यागाळ्या सामान्य मनुष्याला न दिसणाऱ्या परंतु बाबांना व तिथें येणाऱ्या कांहीं योगी लोकांना उघड उघड दिसणाऱ्या मनुष्याला अपाय करणाऱ्या व्यक्तीला ( राक्षसाला ) उद्देशून त्या असत असी या लेखकाची कांहीं काळानें खात्री झाली.

बाबांचे स्पर्श बहुतेक भक्तजनाला उदी देतेवेळीं किंवा चरणसेवेच्यावेळीं बहुतांना होतच होते. तरीही त्यांतूनसुद्धां प्रत्येकाला, एकसारखाच स्पर्श बाबा करीत नव्हते अथवा करूं देत नव्हते, हें मला माहीत होतें व साईलीलेंत प्रसिद्ध झालेल्या अनुभवावरून तें माझें मत दृढ झालें. जेव्हां कोणाला कांहीं बोध ठसवावयाचा असे तेव्हां भक्तांच्या भावाप्रमाणें ते स्पर्श करूं देत व कधींतर स्पर्श करण्यांत अडथळाही आणीत. खापर्डे साहेबांचे कुटुंबास "राजाराम" हा मंत्र जपण्याविषयीं सांगायचा होता, तेव्हां जरी दुपारच्या वेळेस कोणत्याही बायकोला मशिदींत येण्याची परवानगी नव्हती तरी त्यावेळींही त्यांना येऊं देऊन त्यांचा नैवेद्य यथेच्छ अवेळींही भक्षण करून त्यांच्यापुढें पाय करून त्यांना पाय चेपूं दिले व त्या पाय चेपीत असल्यावेळीं बाबाही त्यांचे पाय चेपूं लागले व म्हणाले "राजाराम" "राजाराम" म्हणत जा. एक भक्त, वाड्यांत कांहीं मंडळी क्रिश्चन धर्माची निंदा करीत होती त्यांत सामील झाले, व नंतर कांहीं वेळानें बाबा जवळ गेले, व पायां पडण्यास लागले त्याबरोबर लागलेच बाबांनी आपले पाय मागें आंखडून घेतले. या त्यांच्या कृत्यानें त्या भक्ताला बाबांनीं त्यांना निंदा न करण्याबद्दल उपदेश केल्याची आठवण राहिली व त्यांनी आपले मनांत बाबांची क्षमा मागितल्याबरोबर बाबांनीं त्या भक्ताला प्रेमानें बोलविलें, जवळ बसायला सांगितलें, व आपले पाय पुढें

केले. दुसऱ्या एका भक्ताचे मनांत बाबांचे पांय चेपीत असतां कांहीं कुतर्क आला त्याबरोबर बाबा त्यांना बोलले "मागें सरकुन बैस." मग कांहीं वेळानें त्यांना त्याबद्दल पूर्ण पश्चात्ताप होऊन ते पुनः पाय चेपूं लागले तेव्हां बाबांनी मनाई केली नाहीं असा त्यांच्या स्पर्शांतील अर्थ आहे.

स्पर्शामध्यें बाबांचें मारणेंही आलें. मारण्यासंबंधानेंही पुष्कळ लोकांचे निरनिराळे अनुभव ऐकण्यांत आहेत. कोणी म्हणतो बाबांनीं मला मारल्यापासून माझें अमुक दुःखणें राहिलें. तर कोणी म्हणतो स्त्रियांचे बाबतींतील आपल्या समजुतींत फार अंतर पडलें म्हणजे त्यांची अध्यात्मिक उन्नति झाली. ज्ञानेश्वरींत म्हटलें आहे कीं, " कृष्ण कोपोनि ज्यासी मारी तो पात्र ब्रह्मसाक्षात्कारी." म्हणजे त्यांचे मारणें देखील व्यर्थ नव्हते.

पाहणेंही बाबांचें तसेंच. कांहीं गोष्ट बोलत असतां जर त्यांतला अमुक भाग अमुकाचे साठीं बोलला गेलेला असेल तर तेवढें तें वाक्य बोलल्यावर त्या गृहस्थाकडे बाबा नेमके पहात. तसेच एकाद्या भक्ताच्या मनांत कांहीं सद्विचार आल्यावर तोच दृढ करायचा असल्यास बाबा त्याच वेळेस त्याचेकडे पहात हेंही मला कांहीं काळानें समजलें.

भक्तांच्या भावाप्रमाणेंच बाबा त्यांच्या फुलाफळादिकाचा स्वीकार करीत हें तर सर्वांना माहीत आहेच.

बाबांचें मशीदींत असणें, प्रत्यही लेंडीला जाणें, व तसेंच चावडींत एकदिवस आड जाणें हेंही बोधपरच होतें. असें वाटूं लागलें. जणुकाय मशीदींत वास्तव्य करुन बाबा असें सुचवीत होते कीं मनुष्यानें नेहमीं फकिरांच्या मशीदींत—" फीकरकी फाकी करे उसका नाम फकीर "म्हणजेच "यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम "—वास्तव्य करावें. चावडी वर काय कार्य होत असतें ? असें कोणी म्हणेल तर "चावडिये न्यावो अन्यावो निवडीजे दु ॥ वेदीं अन्यायी पडे । तो निरय भोगें दंडे । संन्याशी वो सुरवाडे । स्वर्गी जिये ॥ ( ज्ञानेश्वरी अध्याय १६ वा ८ व्या श्लोकावर टीका ओळ नं. २९५–२९६ " ) ह्यावरून मला वाटलें कीं पूर्ण ब्रह्मस्वरूपी आपले बाबा एक दिवसा आड न्यायाधीश होऊन बसत

असत व तिथें खऱ्या खोट्याचा न्याय करीत असत. त्यांच्या स्वतःच्या कल्याणासाठीं भक्तलोक बाबांना हें काम करायला लावीत व भक्तांसाठी समाधिसोहळा सोडून बाबा एकदिवसाआड हें काम करीत होते असें मला वाटतें. पुन: असा प्रश्न उत्पन्न होईल कीं बाबांना साकारपरब्रह्मरुप समजणाऱ्यांस हें मत ग्राह्य होईल पण बाकीच्यांना होणार नाहीं. तेव्हां त्या लोकांनाही बाबांच्या चावडींत जाणें एकप्रकारें बोधप्रदच होतें असें वाटूं लागलें. कारण बाबा जणुंकाय अशा स्वतंत्र लोकांना चावडींत जाऊन असें सुचवित कीं मी जसा चावडींत एक दिवसाआड जातों तसें तुम्हीही तुमच्याआंतील सूक्ष्म देहरुपी चावडींत एकदिवसाआड जात जा. व आपले न्याय आपणच वेदाज्ञेनुसार करीत जा. म्हणजे वेदांनीं चांगलें म्हणून म्हटलेलें कार्य केलें असेल तर संतोषरुपी स्वर्ग भोगा, व वाईट कर्म केलें असेल तर त्यांबद्दल श्रुतीस्मृतिमध्यें सांगितलेलें प्रायश्चित भोगा. चावडींत बाबा रोजचे रोज जात नव्हते व त्यावरून बाबांचे ठायीं ज्यांची श्रद्धा नाहीं अशा गृहस्थांना जणुंकाय असें सुचवीत होते कीं नुसत्या विवंचनेंतच सबंध काळ न घालवितां योग्य तें कार्य म्हणजे ज्ञानाअज्ञानाचेपलीकडच्या स्थितींत ( मशिदींत ) रहाण्याचें नेहमीं करीत जावें. लेंडी संबंधीं विचार करतांना, अज्ञानी मनुष्याचें वर्णन करीत असतां एका महापुरुषानें "लेंडी" हा शब्द वापरला आहे. " लेंडीये आला लेंढा " त्याची आठवण झाली व वाटलें कीं आपले साकार ब्रह्म भक्ताकरितां नेहमी—बाबा नेहमी लेंडीत जात होते, म्हणजे ते नेहमीं भक्तांकरितां—अनेक प्रकारचें अज्ञान धारण करून मशिदींत रहात—अज्ञानाचे देखील दोन प्रकार आहेत असें विद्वद्वर्ग सांगतो. एक अज्ञानाकडे नेणारें अज्ञान. व ज्ञानाकडे नेणारें अज्ञान. ज्ञान व अज्ञानाच्या पलीकडे गेलेले बाबा भक्ताकरितां ह्या ज्ञानाकडे नेणाऱ्या अज्ञानाच्या (लेंडीचा) स्वीकार करीत होते. जणूं काय भक्ताला दाखविण्याकरितांच कीं काय अज्ञानाचा स्वीकार करायचा असेल तर असाच केला पाहिजे. नेहमीं बाबा लेंडींत जात होते परंतु त्यांचे कांहीं तिथें वास्तव्य नव्हतें. व त्यावरून मला अशीही कल्पना येते कीं बाबा हेंच सुचवित होते कीं वास्तव्यस्थान

ज्ञान अज्ञानाच्याही पलीकडे आहे. जे भक्त नाहींत व वेदांती आहेत त्यांना लेंडीला जाऊन जणूं काय सुचवीत होते कीं अज्ञानरूपी लेंडींत गेल्याशिवाय—मायेशिवाय ज्ञान नाहीं. व लेंडींत न राहतां मशिदींत राहून त्यांनाही सुचवित होते कीं जरी अज्ञानाशिवाय ज्ञान नाहीं तरीही वास्तव्य-करण्यासारखें ठिकाण—" फकीरकी फाकी करे " असें ठिकाण ज्ञान अज्ञानाच्या पलीकडे आहे.

ह्यावरून मला दिसून आले कीं बाबांचे सर्व व्यापार स्वत:साठीं नसून भक्तांचे बोधासाठींच होते व म्हणूनच तुलसीदास म्हणतात कीं, " भक्तनके काज प्रभु सगुणधारी." तें अगदीं खरें आहे.

## श्री सौभाग्यवती छोटूबाई प्रधान यांनीं पाठविलेले श्रीचे कांहीं अनुभव.

श्री साईबाबांचे दर्शनाचा लाभ होऊन सुमारें दोन वर्षें झालीं असतील नसतील तोंच श्रीनें आमच्या घरांतील सर्व माणसांचा जीव आपल्याकडे ओढून घेतला. आमच्या वडिलांच्या हयातींतला एक पिढीजात तेलंगी ब्राह्मण श्रीशंकरभक्त अति कर्मठ व प्राण गेला तरी अधर्म न करणारा असा आहे. त्यास आम्ही रात्रंदिवस घरांत ठेऊन घेऊन तो रात्रंदिवस श्रीशंकराच्या एकादशण्या करून मुलांस त्रिकाळ तीर्थ देत असे त्या ब्राह्मणाच्या स्वत:च्या नित्य नेमाच्या कांहीं एकादशण्या असत, त्यामुळें त्या ब्राम्हणास प्रात:काळपासून रात्रीं ९।१० वाजेपर्यंत विसांवा म्हणून मुळींच मिळत नसे. पण तो श्रीशंकराचा नि:सीम भक्त असल्यामुळें त्याचा तो काळ सर्व आनंदांत जातो असें त्यास वाटत असे. वर सांगितल्याप्रमाणें बाबांचें दर्शन घेऊन दोन वर्षें झालीं असतील व आमचा एक मुलगा सुमारें एक वर्षाचा असेल. अशा वेळीं वरील माधवभटजी तेलंगी यांचा शंकाराचा रुद्राभिषेक चालू असतांना एके दिवशीं पुन्हां त्या मुलाची प्रकृति बिघडलेली दिसल्यावरून त्या भटजीच्या मनांत असा संशय आला कीं मी तर येवढी श्रीशंकराची आराधना करतों,

पण हे लोक मुसलमानाला भजतात याचमुळें शंकराचा कोप होतो यांत संशय नाहीं. असे विचार त्यांचे मनांत येऊन ते मनांतल्या मनांत आमच्या वर नाराजी झाले व झोंपले. जेव्हां जेव्हां रात्रींच्या वेळीं मुलाच्या दुखण्यास फार जोर होई तेव्हां तेव्हांआम्हीं त्या ब्राह्मणास उठवीत असूं. त्याप्रमाणें त्या रात्रीं आम्हीं त्यांना उठविण्याकरितां खालीं येणार इतक्यांत तेच वर आले, व पहातात तर नेहमींप्रमाणेंच आहे, ते लोच श्री बाबांच्या तसबिरी पुढें बसले व म्हणूं लागले कीं जर हें मला पडलेलें स्वप्न खरें असेल तर ह्या मुलाचा ताप आतांच ५ मिनीटाचे आंत उतरून तो ट्यां खाली येऊन खेळला व कांहीं खाल्ले, व ह्या मुलास कांहींच झालें नव्हतें असें जर सर्वांस वांटलें, व डॉक्टरनेंही आतां माझी गरज नाहीं असे सांगितलें तर मी तुमच्या तसविरीपुढें तात्काळ लोटांगण घालीन, व १५ दिवसांच्या आंत तुमच्या दर्शनास शिर्डीस येईन व १०८ रु. दक्षणा देईन असा नवस करून स्वप्न आह्मांस सांगूं लागले तें असें. "एक मुसलमान श्री साईबाबाप्रमाणें ज्याचा वेष व ज्यानें हातांत एक मोठा सोटा धारण केलेला आहे असा माझे पलंगाजवळ आला व मला उठवून माझे समक्ष माडीचा जिना चढूं लागला व शेवटच्या टप्या वरून मला दटाऊन म्हणतो "तूं काय समजतोस! हें घर माझें आहे, मुलें देणार मी व.हें तुला काय वाटतें कीं तूं ह्या मुलास बरें करणार? तो मुलगा माझा आहे ये तुला दाखवितों" असें म्हणून तो मुसलमान वर माडीवर गेला व मी जागा झालों. तों तसाच हा वर आलों. म्हणून मी बाबूची प्रकृति आतां पाहिल्याबरोबर एकदम स्फूर्तीनें हा नवस केला आहे. तुमचे बाबा जर खरे असले तर प्रचीति दाखवितील व मीही त्यांनां एक सिद्ध पुरुष असें मानून तुमच्या प्रमाणेंच भजेन." त्या प्रमाणें एका तासाचे आंत ताप वगैरे साफ निघून मुलगा हुशार होत चालला. कारण तापांत त्याला खोकल्यानें ही इतकें बेजार केलें होतें कीं त्याला दमा ही सुरू झाला होता. तरी पण खोकला व ताप दोन्ही एकदम नाहींसे होऊन बाबानीं आपली प्रचीति त्वरित दाखविली. व त्या ब्राह्मणांची पक्की खात्री झाली की हे बाबा मुसलमान नसून कबिराप्रमाणें अवतारी पुरुष

आहेत. तेव्हां त्यानें नवसाप्रमाणें तसबिरीपुढें सांष्टांग लोटांगण घातलें व १५ दिवसांचे आंत ते शिर्डीस दर्शनास गेले. बाबांचा दरबार भरला होता. ब्राह्मणास पाहून बाबा ह्मणाले "हा मला कुत्रा मांजर व मुसलमान ह्मणतो." हे ह्मणतांक्षणींच ब्राह्मणानें पायावर शीर ठेविलें व मनांत धरलेली दक्षिणा दिली व स्नान वगैरे करून पूजेस गेले, तेव्हां माधवराव देशपांडे त्यांचे बरोबर तेथें होते. माधवराव ब्राह्मणास ह्मणाले "हां भटजी ध्या, तुमची पूजा उरकून." तेव्हां माधवरावास बाबा ह्मणाले "शामा हा माझी रोज रोज कितीतरी पुजा करतो." पूजा करतांना ब्राह्मणानें आपल्या मनांत असा संकल्प केला कीं हे साधो तुह्मी मला जसे बाबूच्या आरोग्याच्या कामी पावलांत, तसेच जर मला पुत्र संतान नाहीं ह्मणून आज पासूनएक वर्षाचे आंत मला जर पुत्र झाला तर अशीच दक्षिणा मी पुन्हा येथें येऊन तुह्मांस देईन व माझ्या मनांतलें दुसरें एक कार्य सिद्धीस नेलेत तर आणखी दसपट दक्षणा आपणास अर्पण करीन. हे विचार त्या ब्राह्मणाचे मनांत आल्याबरोबर पूजा करितां करितां बाबा मुद्दाम ब्राह्मणास ह्मणतात अरे कांहीं दक्षिणा देतोस काय? त्यावेळीं माधवराव बाबांस ह्मणाले, काय देवा सकाळीं धूळ दर्शनीच ह्या ब्राह्मणानें तुला रगड दक्षिणा दिली ना तरीपण त्याचेपाशीं आणखी दक्षणा मागतोस हें काय? बाबा शामास ह्मणाले अरे सकाळीं काय त्यानें फारच थोडी दक्षिणा दिली, आतां तर त्यानें भक्कम दक्षिणा दिली आहे. त्याचा बोध अर्थात माधवरावास कांहींच झाला नाहीं पण माधवभटजीस अती आनंद झाला व मनांत समजले कीं माझे दुसरे दोन्ही नवस हा संत सिद्धीला खात्रीनें नेणार. त्याप्रमाणें एक वर्षाचे आंत माधव भटजीस पुत्र संतान झालें व ते त्या-पुरता नवसही फेडून आले. व त्या प्रचीतीनंतर. श्री साईबाबांचा फोटो त्यांच्या गांवी त्यांचे वडील बंधूचें दत्त मंदीर आहे त्या दत्ताच्या मुर्तीपुढें ठेऊन त्या मुसलमानी वेष धारण केलेल्या फोटोची पूजा तेलंगणांत दत्ताच्या देऊळीं केली जात आहे. संस्थानच्या कायम फंडाच्या दृष्टीनें माधवभटजींचा

राहिलेला नवस श्री साईबाबा केव्हां सिद्दीस नेतात तें पहावें असें संभ्या-
नचे कांहीं चालकांच्या मनांत येणें साहजिक आहे.

अती कर्मठ ब्राह्मणास त्याच्या श्रद्धेप्रमाणे प्रचिति दाखवून त्याच्या तोंडी नेहमीं " बाबा काय करतील तें खरें " असे उद्गार ऐकून अम्हांस श्री माय माऊलीचे अत्यंत कौतुक वाटतें.

---

नाशीकचे भाऊसाहेब धुमाळ वकील हे महाराजांचे फार जुने व एक निस्सीम भक्त आहेत. त्यांचे कारकून गणेश बाळाजी देशपांडे यांची भाऊसाहेबांमुळें महाराजांवर श्रद्धा जडली. व १९२१ सालापासून ते महाराजांच्या तसबिरीची भक्तीनें पूजा करूं लागले. देशपांडे शिर्डीस कधी गेले नव्हते. गतवर्षापासून देशपांडे यांचे कुटुंबाला पोटशूळाची व्यथा जडली. पुष्कळ औषधी इलाज केले पण गूण येईना. याप्रमाणें बाईनीं ९ महिने दुखणें सोसलें. भाऊसाहेबांना ही हकीकत कळली तेव्हां त्यांनीं कारकुनाला सर्व औषधें सोडण्यास सांगितलीं व महाराजांची उदी लावून पोटशूळ थांबल्यावर दर्शनाला येण्याचा नवस करण्यास सांगितलें. देशपांड्यानीं त्याप्रमाणें केलें व चमत्कार असा कीं उदी लावल्यापासून बाईचा पोटशूळ बंद झाला. देशपांडे नुकतेच सहकुटुंब शिर्डीस जाऊन नवस फेडून आले.

श्री सद्गुरु साइनाथ महाराज व महाराजांचे सन्निध्य कै. रा. रा. नाना साहेब चांदोरकर या उभयतांचे प्रथम दर्शनाची हकीकत.

" मग दाविलेनि जेणें एकें। ब्रह्म आळविलें कवतिकें।
मागा असत ठाकें। पुढां उभें " ॥ ३३ ॥

श्री ज्ञानेश्वरी अ. १७ ओंवी ३३.

मी ज्ञानी नाहीं, शास्त्री नाहीं, पंडीत नाहीं, विद्वान नाहीं, थोर नाहीं, श्री सद्गुरुसेवा कशी करावी अगर भक्ती कशी करावी तें समजत नाहीं, ग्रंथाभ्यास नाहीं, ग्रंथश्रवण नाहीं, पठण नाहीं, मनन नाहीं, निदिध्यास नाहीं, दुसऱ्यास सांगण्याचा तर बिल्कूल अधिकार नाहीं. फक्त संसृतिमोह-जालांत गुरफटुन गेलेला अत एव बाबांच्या चरणारविंदरंजः कणाचा कृपाभिकांक्षी यःकश्चित् अति नम्र दासानुदास आहें.

मनुष्याणां सहस्त्रेपु कश्चिद्यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः

श्री गीता अ. ७ श्लोक ३.

तसेंचः—बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥

श्री गीता अ. ७ श्लोक १९.

वरील भगवंतांच्या वचनावरून सच्छिष्यास सद्गुरूची प्राप्ती होणें जितकें दुर्घट तितकेंच सद्गुरूंसही सच्छिष्य मिळणें कठीण असें स्पष्ट दिसतें.

वरील जोडीचा परस्पर संबंध अशाच प्रकारचा असून बोधपर आहे असें वाटल्यावरून प्रेमी वाचकांपुढें ठेवीत आहें. त्याचा अनुभव या लेखाच्या शेवटीशेवटीं येईल; परंतु हा संबंध सांगण्यास मध्येंच माझी थोडीशी हकीकत सांगणें भाग पडत आहे, त्यास इलाज नाहीं. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणाची याज स्तुति अथवा लक्षणेनें निंदा करण्याचा बिल्कुल हेतु नाहीं.

विद्वज्जन, मातृभाषा लेखन प्रचुर, व्याख्यान पुराण पटु, व संत चरित्रलेखन चतुर, माझे स्नेही रा. रा. पांगरकर बोवा यांनी १८९६ साली आपल्या पदर खर्चानें, विकत आणून, आग्रहानें, नव्हे जबरदस्तीनें कै. अण्णा मोरेश्वर कुंटे यांनी टिपा दिलेली श्री ज्ञानेश्वरीची एक छापील प्रत, त्यावर माझें नांव घालून मला मुद्दाम वाचण्याकरितां दिली. त्या वेळापर्यंत माझे घरांत श्री ज्ञानेश्वरी वाचण्याचा अगर श्री आळंदीस जाण्याचा प्रघात मुळींच नव्हता. बोवांच्या आग्रहास्तव मी ज्ञानेश्वरी वांचूं लागलों. भाषेच्या व अर्थाच्या दुर्बोधित्वामुळें व कोणाची मदतही नसल्यामुळें वाचन नीट चालेना. कधीं वाचावी, कधीं न वाचावी अशीच कित्येक वर्षें गेलीं. वाचनाची आवड अतिशय उत्पन्न झाली, परंतु खिन्नताही तितकीच वाटूं लागली. श्रीदत्तउपासक, नव्हे श्री दत्तावतार परमपूज्य साधुगुरुवर्य श्री अन्या मोने उर्फ बोवासाहेब मुक्काम शिरवळ सं. भोर ही विभूति आमचे घरीं दर चातुर्मासांत यावयाची.व वडिलांस व वडील बंधुद्वयास नित्य वेदांत श्रवण करवावयाची. स्वभाव फार गोड, शांत व यदृच्छालाभसंतुष्ट. संसा-रांत असून विरक्त. त्यांच्या वेदांतज्ञानसरस्वतींत वडलांनीं व वडील बंधु-द्वयांनीं सतत वीस वर्षें यथेच्छ अवगाहन केलें. त्यांचे घरीं दरसाल श्रीदत्त-जयंतीचा उत्सव असे. व माझे वडील किंवा वडील बंधू दरसाल तेथें जात व पैशाची व तांदळाची यथाशक्ती मदत करून गुरु दक्षिणा देत. बोवासा-हेब वारल्यावर कांहीं वर्षांनीं हा उत्सव बंद पडला. व आमचेकडून गुरुदक्षि-णाही जाणें बंद पडली. वडील व वडीलबंधू वारले व आतां ही गुरुदक्षिणा कोठें पाठवावी म्हणून आम्हांस विचार पडला. असो. इकडे (सापत्न) मातामहबंधुद्वयांसही त्याच सुमारास अथवा कांहीं अगोदर परमपूज्य साधुगुरुवर्य श्री चंडिराम महाराज यांच्या मुखकमलांतून स्त्रवणाऱ्या वेदांत व योगज्ञान गंगेंत चासकमान येथें श्री भीमातीरावरील श्री भीमेश्वराचे मंदि-रांत यथेच्छ मज्जन करावयास मिळालें. या सर्व गोष्टी मी वडीलांचे व वडील बंधूंचे मुखांतून बालवयापासून नित्यशः ऐकत असें. आपण जन्मास उशीरां आल्यामुळें, परम भाग्यानें लाधलेल्या वरील जगद्वंद्य साधु व गुरुवर्य विभू-

तीच्या योग व ज्ञान गंगेच्या प्रवाहांत तर राहिलेंच पण त्या गंगेच्या निर्मळ तीराच्या तुषारांतील एखादा कणसुद्धां त्याच कुलाचे आपण अंशभागी असूनही आपल्या वाट्यास आला नाहीं याबद्दल पुष्कळ वेळ वाईट वाटे, व आपल्यासही सद्गुरूंचें दर्शन केव्हां होईल व त्यांच्या बोधामृत ज्ञान गंगेत आपणही कधीं यथेच्छ बुचकुळ्या मारीत बसूं अशी रात्रंदिवस तळमळ लागून राहिली. रात्रीं झोंप येत नसे. मला मार्ग दाखवा कृपा करा. आपल्या-वांचून मला कोणी तारणारा नाहीं. आपणच ज्ञानेश्वरीरूपानें माझे सद्गुरु आहां. मी सद्गुरु शोधण्यास कोठें जाणार नाहीं. मला येथल्या येथेंच दर्शन झालें पाहिजे अशी श्री ज्ञानेश्वर महाराजांची नित्य प्रार्थना करून निजावें. सद्गुरु कोठें असतात, ते केव्हां भेटतात, भेटल्यास ते ओळखावे कसे याबद्दल नानाप्रकारचे विचारतरंग अहोरात्र मनांत घोळूं लागले. चित्त स्थीर होईना. सर्व प्रपंच व्यवहार होत होते पण कोठें जावें, कोणास विचारावें, काय पहावें, काय करावें ही तळमळ. त्यादिव्य, अलौकिक व पुण्य संत शिरोमणींनीं आपल्यावयाच्या अवघ्या १५ अगर १६ वे वर्षी श्री ज्ञानेश्वरी सारखा अनुपमेय व अप्रतीम ग्रंथराज लिहून सर्व जगास थक्क केलें व त्रैलोक्यावर कायमचे उपकार करून जीव सृष्टीस जगाच्या महाप्रलया-पर्यंत ऋणी करून ठेवलें आहे त्या श्री ज्ञानरत्नेश्वर विभूतीच्या समाधिभूमीचें एकवार दर्शन घेऊन खिन्न व चंचल चित्तावर अल्पांशानें तरी स्थिरतेचा इष्ट परिणाम होतो कीं काय तें पहावें म्हणून त्या पुण्यभूमीच्या दर्शन लाभाचा अनेकवार दृढ प्रयत्न केला परंतु अनुकूल परिस्थिति असतांना व तीव्रतर इच्छा असतांनासुद्धां प्रत्येक वेळां कांहीं ना कांहीं अनपेक्षित अडचणी येऊन तो बेत रहावा. एकवेळ तर इंग्रजी तिसरें किंवा चवथें यत्तेंत पुण्यास असतांना परम पूज्य वडील भगिनी बरोबर श्रीक्षेत्र आळंदीस जाण्याकरितां त्यांचेच गांवाहून निघून अर्ध्या वाटेतूनच असह्य दाढ दुखूं लागल्यामुळें परत आलों. पुढें माझी बी. ए. ची परिक्षा होऊन नोकरी लाग-ल्यावर सर्व जरूर त्या साधनांची अनुकुलता, तयारी व उत्कठ इच्छा अस-तांही व श्री अलकापुरीस जाण्याकरितां पुण्यापर्यंत गेलों असतांही सर्व बेत निष्फल झाले. अलकापुरी दूर ती दूरच राहिली. आपल्या हीनभाग्याची

कमाल थाहे. असें वाटूं लागलें. असो. हीच हकीकत फार लांबत चालली पण महाराजांचे अवर्णनीय लीलेशीं तिचा निकट संबंध असल्यामुळें ती सांगितल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण आतां मात्र थोडक्यांतच आटोपतों. रा. रा. पांगारकर बोवांनीं श्री ज्ञानेश्वरी १८९६ सालांत मला दिली. पण त्याचे फार फार पूर्वीपासून आनुवंशिक संस्कारामुळें म्हणा अगर परमपूज्य वडील व वडील बंधू यांचे मुखांतून निरंतर वेदांत श्रवणामुळें म्हणा श्री ज्ञानेश्वर समाधीचें पुण्य दर्शन अलकापुरीवास श्री इंद्रायणी माईचें पवित्र स्नान व महाराजांचा अनुग्रह केव्हां होईल या विषयींची अनावर इच्छारूपी वाललता माझे अंतःकरणांत बालपणापासूनच वाढूं लागली होती. परंतु त्यावेळीं मूर्तिमंत ज्ञानेश्वरावतार श्री सद्गुरु साई महाराज यांचें दर्शन झाल्यावाचून श्री आळंदीचें दर्शन झाल्याचा लाभ व थोरवी लक्षांत येणार नाही. असा श्री साईज्ञानेशांचा संकल्प असल्यामुळेंच कीं काय कोण जाणे बालपणा पासून वाढीस लागलेल्या वरील इच्छारूपीं लतेस बाबांनीं १९१० नवंबर ता. ३० पर्यंत जास्त वाढूंच दिलें नाहीं म्हणजे श्री अलकापुरीस जाण्याचे सर्व बेत सिद्धीसच जाऊं दिले नाहींत. पण असें म्हणण्याचें अघोर पाप करण्यापेक्षां माझी इच्छाच तीव्र नव्हती व तिला तीव्रता बाबांचें दर्शन झाल्यानंतरच येणार होती असें म्हणणेंच जास्त प्रशस्त दिसतें. कसेंही असो मौज हीकीं बाबांचें दर्शन झाल्याबरोबर त्याच खेपेस १० च दिवसांचे रजेंतच अनायासें श्री आळंदीचें व इतर पांच सात पुण्य क्षेत्रांचें व दुसऱ्या दोन दिव्य साधुमूर्तींचें प्रत्यक्ष दर्शन झालें व अत्यानंद वाटला.

आतां बाबांचें व नाना साहेबाचें दर्शन कसें व केव्हां झालें त्याची मजेदार हकीकत थोडक्यांत सांगून वरील श्री ज्ञानेश्वरींतील ओवी व श्री गीतेंतील श्लोक, या जोडी संबंधानें किती अर्थ पूर्ण आहेत तेंही थोडक्यांत लिहितों.

बालपणापासूनची उत्कट इच्छा व तळमळ आणि प्रत्यक्ष सद्गुरुदर्शन यांचे दरम्यान फारच काल गेला हें वरील हकीकतीवरून कळेलच

प्रार्थना करतां करतां सन १९१० चे जून महिन्यांत एके रात्रीं मला एक स्वप्न पडलें तें असें कीं मी व माझी मुलगी चि. रंगूबाई असे दोघे-जण एकाशहरांतून किंवा गांवांतून सकाळीं ८-९ वाजतां १०-१२ फुटांचे रुंद रस्त्यावरून जात आहों. रस्त्यावर थोडथोडा सुकलेला चिखल पडला आहे आम्ही चाललों आहों इतक्यांत समोरून दोन गृहस्थ येत आहेत असें पाहिलें. त्यांपैकीं अंगांत पांढरा अंगरखा डोक्यास तांबडें पागोटें ( पगडी ) पांढरें धोतर नेसलेले व खांद्यावर पांढरें उपरणें घेतलेलें असे होते. दुसरे डोक्यावर पांढरा रुमाला अंगांत खादीची बंडी व पंचा नेसलेले असे होते. पहिले तरुण, दुसरे वृद्ध, दोघे फार गोरे नाहींत, काळे नाहींत पण उजळ रंगाचे ते दोघेजण आमच्या जवळ आल्यावर तांबडे पागोटेवाले गृहस्थ मला म्हणाले " अहो थांबा, हे मजबरोबरचे दुसरे गृहस्थ कोण आहेत हें तुम्हांस माहीत आहे काय ? " मी म्हणालों " नाहीं" ते म्हणाले " हे दत्तगुरु आहेत. " असें ऐकतांच मी व माझ्या मुलीनें त्यांस तेथें रस्त्यांतच साष्टांग नमस्कार घातला व आम्ही उठून उभे राहिलों नंतर तांबडे पागोटे-वाले मला पुन्हां म्हणाले "अहो यांना दक्षणा द्या." तेव्हां मी खिशांतून पैशाचें पाकीट कढून त्यांतील एक अधेली मुलीचे हातांत दिली व ती महारा-जांना दे व नमस्कार कर असें सांगितलें. तिनें त्या प्रमाणें केलें. नंतर मी एक पावली पाकीटांतून काढिली. तेव्हां तांबडे पागोटेवाले मला म्हणाले " अहो हें काय करतां" मी म्हणालों ती दक्षणा मुलीनें दिली आतां ही मी देतों व त्या प्रमाणें मी श्री दत्तगुरुरायास दक्षणा देऊन वंदन केलें. नंतर श्री म्हणाले कांहो तुम्हास मुलें किती" मी म्हणालों "तीन, ही मुलगी व दुसरे दोन मुलगे" ते म्हणाले "बरें बरें. आम्हांस मूलबाळ कांहीं नाहीं." मी म्हणालों "महाराज असें कसें म्हणतां ? हें सर्वजग ही आपलींच मुलें नाहींत कां ?" यावर ते म्हणाले " हो हो तसें पाहिलें म्हणजे आम्हांस पुष्कळ मुलें आहेत." असें बोलून ते मागें वळले. आम्हींही त्यांचे मागें गेलों. तों एक चौसोपी मोठा व मजबूत पण ठेंगणा असा वाडा पाहिला. त्यांत स्वयंपाक चालला होता. कांहीं मंडळी जेवत होती. वरील दोन्ही विभूति व माझी मुलगी तेथें नज-रेस पडली नाहीं. मी एकटाच तेथें होतों, असें पाहून जागा झालों."

नंतर ता. २६-६-१९१० रोजीं मी निकावली येथें कामाकरितां गेलों. तेथील पाटील ( ज्यास मी बेत्रा म्हणत असें ) मला म्हणाला, तुम्हास अलीकडे साधुसंतांचें दर्शन झालें आहे काय ? मी नकारार्थी उत्तर दिलें. तो म्हणाला असें कां ? झालेंच पाहिजे. मी पुन्हा तेंच उत्तर दिलें. तो म्हणाला बरें तर दर्शन एक वर्षाचे आंत होईल. पण अशी वेळ आली म्हणजे मला मात्र विसरूं नका. माझी आठवण ठेवून मला तुम्ही आपले बरोबर घेऊन जा मी म्हणालों पण तूं म्हणतोस हें खरें कशावरून ? तो म्हणाला मी तुम्हांस स्वप्नांत तुमचे घरीं एका साधूबरोबर बोलतांना पाहिलें. मी बाहेर उभा होतों. व तुम्ही ज्यांच्याबरोबर बोलत होतां त साधू होते असें मला त्यावेळीं वाटलें. व म्हणूनच मी म्हणतों कीं तुम्हांस साधुदर्शन लौकरच होईल. नंतर मी त्यांस मला पडलेलें वरील स्वप्न सांगितलें. व म्हणालों कीं जर झालें असेल तर मला स्वप्नांत साधुदर्शन झालें आहे. प्रत्यक्ष जाग्रतींत नाहीं. तो म्हणाला असें काय उपयोगाचें ? प्रत्यक्षच झालें पाहिजे व होईल. यानंतर थोडया दिवसांनीं माझे धाकटे बंधू चि. रा. सदाशिवराव यांजकडून मला एक पत्र आलें कीं नानासाहेब चांदोरकर म्हणून कोणी प्रांतसाहेब आहेत. ते तिकडे गेले असतां प्रत्येक बाबतींत साईमहाराज यांचें नांव काढीत. म्हणून साईमहाराज म्हणून कोणी तरी त्यांचे गुरु असावेत असें वाटतें. त्यांची भेट घेऊन जसें आपले विचारास येईल तसें करावें. ते हल्लीं तुमचे जिल्ह्यांतच दप्तरदार म्हणून बदलून गेले आहेत. यापूर्वींच म्हणजे १९१० चे एप्रिल २१ तारखेस माझी साक्ष ठाण्यास एका खटल्यांत नानासाहेबापुढें होती. पण त्यावेळीं बाबांचा व नानासाहेबांचा संबंध मला मुळींच माहीत नव्हता व माझी त्यांची ओळखही नव्हती. साक्ष झाली व मी परत गेलों. नंतर सप्टेंबर १९१०चे पहिले अगर दुसरे तारखेस नानासाहेबांचे जामात रा.रा. दत्तोपंत पेंढारकर (यांची व माझी पूर्वीपासून बरेच दिवस ओळख होती) यांनी मला (बहुतकरून तारापूर येथें कारण तेथेंच ते इंग्रजी शाळेत मास्तर असत) बाबांबद्दल कांहीं हकीकत सांगून महाराजांचा एक लहानसा म्हणजे चौकोनी रुपयाएवढा फोटो दिला. व विस्तृत हकीकत नानासाहेब सांगतील असें म्हणाले. नंतर नानासाहेब ठाण्याहून बदलून वसईस प्रांत झाले. त्यावेळीं त्यांची माझी

गांठ २७-९-१० व ३०-९-१० रोजीं डहाणू स्टेशनवर पडली. परंतु घरीं अडचण असल्यामुळें बाबांचें कथामृत यथेच्छ पान करण्याची उत्कट लालसा होती तरी मला त्यांचेबरोबर बोइसर अगर डेंवर गांवांपर्यंत जातां येईना व दोन तीन वेळ गांठ पडूनसुद्धां इच्छा फलद्रूप होईना. पुढें भेटेन तेव्हां सांगेन असें नानासाहेब म्हणाले. ता. २८ आक्टोबर रोजीं माझी व त्यांची गांठ पुन्हां ठाण्यास पडली. ते म्हणाले महाराजांबद्दल दोन प्रकारची माहिती देतां येईल. चमत्काररूपाची व तात्विकरूपाची. तुम्हास कोणती पाहिजे ती बोला. मी म्हणालों आपल्यास वाटेल तो प्रकार मला सांगा, नंतर आपा कुळकर्ण्यांबरोबर आपल्यास महाराजांकडून कसा निरोप आला, आपण त्यांचे दर्शनास कसे गेलों, मशीद बांधण्याची हकीकत, श्री बनुमाईची हकीकत, प्लेगची लस टोंचून घेण्याची हकीकत, डोंगरांत तृषापीडित झाले असतां अकल्पित पाणी मिळाल्याची हकीकत वगैरे प्रत्यक्ष अनुभवाच्या ( याबद्दल सविस्तर हकीकत मी यथाक्रम पुढें देणार आहें. ) अति गोड, सुरस हृदयंगम व बोधप्रद अशा महाराजांबद्दलच्या कथा व लीला नानासाहेबांनी मला सांगितल्या. नंतर ते कल्याणास गले. मी डहाणूस गेलों, झालेली हकीकत परम परोपकारी भाविक व बाबांचे परमभक्त व मजवर प्रेम करणारे माझे स्नेही रा. रा. जनु भाऊ उर्फ अण्णासाहेब करंदीकर यांस निवेदन केली व एकवार आपण महाराजांचें दर्शनास जाऊं अशी इच्छा प्रदर्शित केली. ते म्हणाले ठीक आहे. आम्ही जाण्याचा बेत केला व निकावलीचे पाटलासही कळविलें. परंतु मध्यंतरी म्हणजे ४-११ पासून २९-११-१० पर्यंत मी आजारी पडलों. नंतर १० दिवसांची किरकोळ रजा घेतली. जनुभाऊंचें काम आटोपेना. ते म्हणाले ७-८ दिवसांनीं जाऊं नंतर ता. ३०-११-१० रोजीं जाण्याचा बेत केला. निकावलीचा पाटीलही आला. पण तुम्हास जसें वारंट आलें तसें मला कोठें आलें आहे व शिरडीस काय आहे? ते सत्पुरुष असतील असें मला वाटत नाहीं. माझी श्रद्धा नाहीं. तेथें येऊन काय करावयाचें? वारंटावांचून जाणें बरें नाहीं. माझीही चित्तवृत्ति डळमळूं लागली. मन उदास झालें. नानासाहेबांस महाराजांनीं निरोप पाठविला, आपल्यास कां बरें बोलावणें येऊं नये? अशा कु व सु

विचारांचें मनांत तुंबळ युद्ध सुरू झालें. झालेला निश्चय बदलावा अगर कायम ठेवावा कांहींच कळेना. एकवार वाटे पाटील म्हणतो हीच गोष्ट खरी. पुन्हा वाटे नानासाहेब सांगतात ही हकीकत असत्य कशी असेल! ही सर्व हकीकत जनुभाऊंस सांगितली. ते म्हणाले बोलावणें कशास पाहिजे. नानासाहेबांचा संबंध निराळा तुमचा निराळा. शिवाय तुम्हांस जें स्वप्न ( मी जनुभाऊंना मजला पडलेलें व पाटलास पडलेलें स्वप्न व माझे बंधूकडून आलेलें पत्र व नानासाहेबांच्या भेटींची हकीकत सांगितली होती.) पडलें आहे तें बोलावणेंच नव्हे का ? सत्पुरुषांचे दर्शनास बोलावण्याची आवश्यकता नसते. इतक्यांत प्रांत साहेबांकडून लिहून आलें कीं रजेवर जाणें असल्यास तावडतोब जा. १० दिवसांची रजा ७ दिवसांची केली आहे व उशीर लावल्यास सर्वच रजा रद्द केली जाईल. मी जनुभाऊंस ही गोष्ट सांगितली व म्हणालों की महाराजांचें पक्कें वारंट सुटलें. आतां मात्र गेलेंच पाहिजे. नंतर आम्ही तीस तारखेचाच बेत कायम केला. बोवा म्हणाला तुम्हास येतों म्हणून पूर्वी सांगितलें होतें म्हणून येतों. वास्तविक खऱ्या अंतःकरणानें मात्र येत नाहीं. तुला वाटेल तर ये नाहीं तर येऊं नकोस. तुझ्याच म्हणण्याप्रमाणें तुला कळविलें आहे. तुझ्या इच्छेस येइल तसें कर, असें मी त्यास सांगितलें.

नंतर ठरलेल्या दिवशीं मी, जनुभाऊ व बोवा असे तिघेजण निघालों व शिरडीस गेलों. श्रीचें दर्शन वाटेंतच झालें. आम्ही साठे साहेबांचे ( हल्लीं नवलकर साहेबांचे) वाड्यांत रा. रा. बापूसाहेब जोग यांजकडे उतरलों व श्रीचें दर्शनास मशीदींत गेलों. श्रीस पहातांच स्वप्नाची आठवण होऊन स्वप्नांत पाहिलेले दत्तगुरु तें हेच व तांबडे पागोटेंवाले ते नानासाहेब चांदोरकर असें एकदम लक्षांत आलें व महाराजांच्या लीला—नाटकाची धन्यता वाटली, व परमानंद झाला. स्वप्नांत पाहिलेल्या त्या ह्याच दोन मूर्ती असा अनुभव पटला, साम्यही पटलें, व तो साठेसाहेबांचा वाडाही पटला. व परब्रह्म सद्गुरू आपल्या पाठीमागेंच उभे आहेत, आपण त्यांस अनन्यभक्तीनें व अंतःकरणपुरस्सर शरण गेल्यानें व मनोभावापासून आळविल्यानें ते पुढें येऊन उभे राहतात ही प्रीतीवरील श्रीज्ञानेश्वराचे ओवींत लिहिल्याप्रमाणें पूर्णपणें

आली. व बाबा ज्ञानेश्वरावतार आहेत हेंही पटलें. तसेंच बाबा दत्तगुरु आहेत हेंही पटलें. व मी उशिरानें जन्मास आलों तरी माझे कुलगुरु माझे जवळच आहेत हेंही पटलें. व गुरुदक्षिणा कोणास देण्याची अगर कोणाकडे पाठविण्याची याचाही निकाल लागला. बाबांचें दर्शन झाल्याबरोबर त्याच खेपेस व त्याच रजेमध्यें श्री आळंदीचें व इतर ६–७ पुण्यक्षेत्रांचें व २ संतांचें दर्शन झालें. परमानंद झाला व बाबांच्या लीलेचें साश्चर्य कौतुक वाटलें व सद्गुरूंच्या पदकमलांचा लाभ झाल्याबद्दल समाधान वाटलें. याचे पुढील हकीकत व अनुभव ही मनोहर आहेत ते यथावकाश केव्हां तरी देईन शेवटीं षडगुणैश्वर्य श्री सद्गुरू साईज्ञानेश्वरपुण्यपदारविंदी खालील अष्टदलकमळ अनन्यभावानें अर्पण करून आपली रजा घेतों.

## पृथ्वीवृत्त

अनंत जननात्परं मनुज जन्म नाथाऽलभे।
द्विजस्य विमले कुले समुपदिष्ट–श्री–धी–मतः।
पुनश्च वहु दुर्लभस्तव पदाब्जलाभोऽभवत्।
अतःपर पदांबुजं नहि कदापि हास्यामि ते।

अर्थः—हे नाथ ( साइनाथ ) अनंत जन्मानंतर मला मानवजन्म प्राप्त झाला. व तोही श्रीमान् व बुद्धिमान् व सद्गुरूंनीं अनुग्रहीत अशा शुद्ध ब्राह्मणाचे कुळांत प्राप्त झाला. शिवाय परम दुर्लभ अशा आपल्या पदकमलाचा लाभ झाला करितां मी आपलें पदकमल आतां कधींही सोडणार नाहीं.

विधे यदि सुदुर्लभं मनुज जन्म जन्मान्तरे।
बिडाल इह सुंदरे खलु भवामि त्वन्मंदिरे।
तवांघ्रि दधि गोरसं समुपविश्य पास्यामहो।
परं परपदांबुजं नहि कदापि हास्यामि ते॥ २॥

अर्थः—हे साइचतुरानना, दुसरे जन्मीं मनुष्यजन्म मिळणें मला जर कठीण असेल तर खरोखर ह्या जगीं मी आपल्या मनोहर मंदिरांत मांजर होईन. आपल्या पायाजवळ बसून आपल्या पायांवर ( भक्तजनांनीं ) घात-

लेल्या पंचामृतापैकीं दहीं व दूध पिईन. ( व मोठ्या आनंदानें जन्म घाल-वीन ) पण आपले चरणकमल मात्र कधीं सोडणार नाहीं.

भवेयमिह तव नो यदि भव विडालोऽप्यहं ।
तवालये पिपीलिका किल भवे यमस्याप्यहो ।
घृतंच मधु शर्करां तव सुपादपंचामृतात् ।
परं परपदांबुजं नहि कदापि हास्यामि ते ॥ ३ ॥

अर्थः—या जगतितलावर आपल्या मंदिरी मांजरही न झालें तर आपल्या घरीं खरोखर मुंगी होईन व आपल्या सुंदर पायावरून खाली पड-लेल्या पंचामृतांतील तूप, मध, व साखर ( मोठ्या आनंदानें ) खाईन ( व निर्वाह करीन ) परंतु आपलें पादपद्म मात्र कधींही सोडणार नाहीं.

न शक्यमपि तद्भवे यदि तु सूक्ष्म जंतोर्जनुः ।
भवेय मतिरम्यगंधित गुलाब[1] पुष्पं नवं ।
तवार्चन विधौ सदा तव पदे निवत्स्याम्य हो ।
परं परपदांबुजं नहि कदापि हास्यामि ते ॥ ४ ॥

अर्थः—हे साइमाधवा मुंगीसारख्या सूक्ष्म जीवाचाही जन्म येणें मला शक्य नसेल तर मी फार रमणीय ताजें व सुवासिक असें गुलाबाचें फूल होईन व निरंतर आपल्या पूजासंभारामध्यें राहून आपल्या पायांवर बसेन. परंतु कांहींकेल्या आपले पदारविंद मात्र सोडणार नाहीं.

सुरम्यकुसुमं सदाशिव भवामि नो चेदहं ।
पवित्र तुलसीदल त्रिदल बिल्व दूर्वांकुराः ।
भवेयमति कोमले तव पदेच तिष्ठाम्यहो ।
परंपर पदांबुजंनहि कदापि हास्यामि ते ॥ ५ ॥

अर्थः—हे साइशंकरा मनोरम गुलाबाच्या फुलाचा ही मला जन्म मिळाला नाहीं तर मी पवित्र तुलसीदल बिल्वपत्र व दूर्वांकुर होईन व आपल्या सुकुमार चरणपुष्करावर ( मोठ्या आनंदानें ) राहीन परंतु आपलें चरणसरोरुह मात्र कधींही सोडणार नाहीं.

---

१ गुलाबास संस्कृतांत नांव मिळत नसल्यामुळें " गुलाब " हेंच नांव कवितेंत कायम ठेविलें आहे.

अशक्यमपि चेत्तु तच्छयनगेह कुंद प्रभं।
भवामि मृदुलासनं तव तथा प्रियाच्छादनं।
सुखं त्वनुभवामि ते चरणपद्म संस्पर्शजं।
परं परपदांबुजं नहि कदापि हास्यमि ते ॥ ६ ॥

अर्थ:—तोही जन्म येणें मला शक्य नसेल तर आपल्या शयनघरांतील कुंदपुष्पाप्रमाणें पांढरे स्वच्छ व सुशोभित अशी आपली मऊ गादी व आपले प्रिय पांघरूण होईन. व आपल्या चरणकमलाच्या स्पर्शापासून उत्पन्न होणाऱ्या सुखाचा अनुभव घेत राहीन. परंतु आपले चरणकुशेशय मात्र कधींही सोडणार नाहीं.

न वा यदि तु सद्गुरो तदपि जन्म विंदाम्यहं।
भवामि तव पादुकाश्चिरमुपानहश्चोत्तमाः।
वहामि सततं मुदा शिरसित्वत्पदे पेलवे।
परं परपदांबुजं नहि कदापि हास्यामिते।

अर्थ—हे सद्गुरो तोही ( अंथरूणपांघरुणाचा ) जन्म मला मिळाला नाहीं तर भी आपल्या पादुका व जोडे होईन व आपले कोमल पद निरंतर मस्तकावर घेऊन जात जाईन परंतु आपले चरणपंकेरुह मात्र कधींही सोडणार नाहीं.

न जन्म सुलभं हि तद्यदि तु साइनाथ प्रभो।
त्वदीय सुनिकेतने खलु भवामि संमार्जनी।
'पदाब्जशुभरेणु पावन भुवंच संमार्ज्म्य द्दो।
परं परपदांबुजं न हि कदापि हास्यामि ते।

अर्थ—हे प्रभो साइनाथ तोही जन्म मिळणें सुकर नसेल तर निश्चयानें मी आपल्या सुंदर सदनांतील केरसुणी होईन व आपल्या पदकमल शुभधूळीचा स्पर्श झाल्यामुळें पवित्र झालेली भूमी मी मोठ्या आनंदानें झाडीत राहीन. परंतु एकदां हातीं लागलेले आपले चरणाब्ज कांहीं केल्या सोडणार नाहीं ठाणें २।७।२५ बाबांचें बाळ

श्रीसाई

दादर ता.१३।८।१९२५

रा. रा. श्रीसाईलीला कर्ते यांस कृ. शि. सा. न. वि. विशेष,

आपल्या एखादे श्रीसाईलीलेच्या अंकांत खालील पदास कृपा करून स्थान देऊन मला आभारी कराल अशी आशा आहे. ह्या पदांत " श्री साईबाबा की जय" अशी अक्षरें आलेली आहेत तरी माझा हा अल्पसा व पहिलाच प्रयत्न आपल्या मासिकांत प्रसिद्ध करण्यांस पुनरपी विनंती करितें.

## पद ( चालः—नृपममता रामावरती )

श्रीपती रघूत्तम राया । बालिका वंदिते पायां ॥ साईशा ध्रु० ॥
साधुसंत बहु देखीले । रत्न तुजसम नच आढळलें ॥ आजवरी ॥
इच्छा मनिं थोरही होती । नयनीं कधिं देखिन मूर्ती ॥ दृश्यती ॥
बालेची ना पुरविली आस । स्वप्नि तरी तृप्त मनास ॥ तूं करी ॥
बाबा श्री साईनाथा दत्ता अवधूता । सत्वरि आतां ॥
दर्शना देई, दर्शना देई । बाला कर जोडूनि विनवी ॥ साईशा ॥
कींव नच का तुजसी येत । सप्रेमें तुजसी आळवीत ॥ बालिका ॥
जरी अन्याय अनंतही असती । मातेसम घालीं पोटीं ॥ साईशा ॥
यश देई गावया कीर्ती । दावि तव मूर्ती ॥
दयाघन देवा, दयाघन देवा । लीलेची मनिषा पुरवा ॥ साईशा ॥

कु० लीला. रा. चोनकर

## शुद्धिपत्रक

यावर्षाचे श्रावणाचे अंकांत स्फुट विषयाचे पोटीं पृष्ठ २४२ वर छापलेल्या श्रीसद्गुरुप्रार्थना दशका संबंधें:—

| | | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | वे श्लोकाचे पहिले चरणांत | विपर्यास | विपर्यासः |
| ९ | वे ,, | च्छेत्ता | छेत्ता |
| १० | वे ,, | प्रभो | विभो |

# अध्याय ३२ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

आतां पूर्वाध्यायीं कथन । पावला विजयानंद निर्वाण ॥
बाळकरामही निजानंदलीन । साईचरण संनिध ॥ १ ॥

तैसेच तात्यासाहेब नूलकर । तेवीही निःसीम भक्तप्रवर ॥
उभयतांही अर्पिलें शरीर । दृष्टीसमोर साईंच्या ॥ २ ॥

याहून मोठा चमत्कार । व्याघ्रासारिखा प्राणी क्रूर ॥
तयाचाही निधनप्रकार । परिसिला सविस्तर श्रोत्यांनीं ॥ ३ ॥

आतां सांप्रत अध्यायांत । स्वयें बाबांच्या मुखें वर्णित ॥
ऐसा गोड कथितों वृत्तांत । श्रोतयां अत्यंत हितकारी ॥ ४ ॥

असतां एकदां बाबा वनांत । झालें गुरुदर्शन अकल्पित ॥
कैसी गुरूची करणी अद्भुत । परिसा तें चित्त देऊनी ॥ ५ ॥

या कथेची परम नवलाई । वानूं मी पामर किती काई ॥
भक्तिश्रद्धामुक्तिदाई । स्वमुखें साई वदले जी ॥ ६ ॥

तैसेंच एका बाईचें मन । होतां घ्यावें बाबांचें दर्शन ॥
वसावें तेथें दिवस तीन । रहावें निरशन व्रतस्थ ॥ ७ ॥

कैसा तियेसीं आणिला प्रसंग । कैसा करविला निर्धारभंग ॥
कैशा पुरणपोळिया सुरंग । करविल्या स्वपंग निजकरवीं ॥ ८ ॥
पोळ्या केवळ नाहीं करविल्या । यथेच्छ निजकरवीं खावविल्या ॥
परकार्यार्थ देह झिजविल्या । सार्थकीं लाविल्या हें श्रेय ॥ ९ ॥
यांतची आहे परम कल्याण । उपासाहून अनेक गुण ॥
कैसें तिजला दिलें ठसवून । कधींही विस्मरण न घडेसें ॥ १० ॥
तैसेंच जया परमार्थीं आवड । कैसा करावा अभ्यास दृढ ॥
करावें कैसें साहस अवघड । साधाया जोड नित्याची ॥ ११ ॥
ये अर्थींचा कथानुक्रम । अमृताहूनही गोड परम ॥
श्रोतयां उपजेल भक्तिप्रेम । दुःखाचा उपरम होईल ॥ १२ ॥
आतां येथोनि कथा गोड । श्रवणार्थियांचें पुरेल कोड ॥
वक्त्यां श्रोतयां स्वानंदजोड । पुरेल होड श्रवणाचें ॥ १३ ॥
प्रेमभरित अलौकिक । वदवितील साईकथानक ॥
मज पामरा मूर्खा देख । लिहितांही कौतुक पदोपदीं ॥ १४ ॥
जेवीं गंगादर्शनें पाप । अथवा चंद्राच्या दर्शनें ताप ॥
तेवीं साईमुखींचे आलाप । पाप-संताप-हारक ॥ १५ ॥
आतां आपण श्रोतेजन । करा श्रवणार्थीं सादर मन ॥
महाराज साईमुखींचें वचन । निजगुरुदर्शनकारक ॥ १६ ॥
जरी वेदवेदांग अध्ययन । केलें श्रुतिशास्त्र पारायण ॥
गुरुकृपेवीण नाहीं ज्ञान । इतर तो शीण केवळ ॥ १७ ॥
अव्यक्तादि स्थावरांत । हा संसारवृक्ष अति विस्तृत ॥
जन्ममरण शोकाकुलित । दृष्टजात नाशिवंत ॥ १८ ॥
छेद आणि नाशयुक्त । म्हणोनि यातें वृक्ष वदंत ॥
तो हा अव्यक्त स्थावरांत । वृक्षोपमित संसार ॥ १९ ॥

तो हा दृष्ट नष्टस्वरूप । ऊर्ध्वमूळ संसार विटप ॥
जयाचा अपार शाखाव्याप । नाकळे अत्यल्प ही कल्पना ॥ २० ॥
क्षणामागें क्षण लोटे । तैसा हा पसरे फुटती फाटे ॥
कधीं दुरून रमणीय वाटे । आलिंगितां कांटे सर्वांगीं ॥ २१ ॥
कदलीस्तंभसम निःसार । जैसें मृगजल वा गंधर्वनगर ॥
तृष्णाजळें बद्धपरिकर । ऐसा हा तरुवर साजिरा ॥ २२ ॥
अविद्या काम कर्मोद्भव । अव्यक्त बीजामाजो प्रभव ॥
जो प्रतिक्षण अन्यथा स्वभाव । असतां अभावात्मक स्वयें ॥ २३ ॥
अनर्थात्मक हा ठायींचा । अविद्येपोटीं जन्म याचा ॥
ईषणातृष्णादि पाणियाचा । सांठा तयाच्या सभोंवतीं ॥ २४ ॥
धनधान्य पुत्रदारा । परिग्रहाचा जया पसारा ॥
देहबुद्धीमुळें या थारा । तया आधारा तो वर्ते ॥ २५ ॥
अनंत प्राणी लिंगभेद । हेच जया वृक्षाचे स्कंध ॥
कर्मवासनादि पारंब्या निर्बंध । तेणें हा संबंध फोफावे ॥ २६ ॥
श्रुतिस्मृत्यादि पत्रीं जो भरला । शब्दस्पर्शादि पल्लवीं तरतरला ॥
यज्ञदान क्रियाकुसुमीं डवरला । रसरसला जो द्वंद्वरसीं ॥ २७ ॥
अंत नाहीं याचिये फळां । उपजीविकाभूत हा सकळां ॥
भूर्भुवादि लोक हा सगळा । ययावेगळा राहीना ॥ २८ ॥
कधीं नृत्य गीत वादन । कधीं क्रीडा हास्य रुदन ॥
ऐसा हा अश्वत्थ सनातन । अधोवदन सर्वदा ॥ २९ ॥
शबल ब्रम्हीं आविर्भाव । असंग शस्त्रें जयातें अभाव ॥
शुद्धमूलाधार जो सद्भाव । ज्योतिस्वभाव तो जाणा ॥ ३० ॥
तें ब्रम्हसत्य सर्वाधार । जग हें मिथ्या स्वप्नाकार ॥
जया न आद्यंत निर्धार । मध्येंच वसणार कैसें तें ॥ ३१ ॥

यदर्थ परिश्रम करिती निरक्त। संत संतत जेथें अनुरक्त ॥
मुमुक्षूंचें जे अपेक्षित। जें अभीप्सित साधकां ॥ ३२ ॥
असेल इच्छा तें ठायीं पडावें। तेणें संतासीं शरण रिघावें ॥
मग ते वदतील तें तें ऐकावें। समूळ वर्जावें कुतर्का ॥ ३३ ॥
बांधूनियां मनाची मोट। करूनि बुद्धीचा कडेलोट।
होऊनियां निःसंग निफट। लक्षावें नीट गुरूचरणां ॥ ३४ ॥
कुतर्कांचा करा झाडा। ना तों करितील मार्गांत झगडा ॥
अभिमान पायातळीं रगडा। तरिच पैलतडा पावाल ॥ ३५ ॥
ये अर्थीची गोड आख्यायिका। बाबा स्वयें वदले ती ऐका ॥
सेवितां गुरुवचन पीयूखा। परम हरिखा पावाल ॥ ३६ ॥
एकदां आम्ही चौघेजण। वाचूनि पोथीपस्तक पुराण ॥
करूं लागलों ब्रह्मनिरूपण। ज्ञानसंपन्न होऊनि ॥ ३७ ॥
'उद्धरेदात्मनात्मानं'। हें गीतेचें घेऊनि वचन ॥
अयुक्त सर्वथैव परावलंबन। ऐसें प्रवचन एक करी ॥ ३८ ॥
तयां प्रत्युत्तर करी अन्य। मन स्वाधीन तोचि धन्य ॥
असावें संकल्प-विकल्प-शून्य। कांहीं न आपणाविण जगीं ॥ ३९ ॥
अनित्य सर्व सविकार। नित्य एक निर्विकार ॥
म्हणोनि नित्यानित्य विचार। करा निरंतर तिजा वदे ॥ ४० ॥
चवथ्या नावडे पुस्तकी ज्ञान। करूं आदरीं विहिताचरण ॥
कायावाचा पंचप्राण। करी समर्पण गुरूचरणीं ॥ ४१ ॥
गुरू परमात्मा चराचर। भरला असे सबाह्याभ्यंतर ॥
ऐसा व्हावया निज निर्धार ॥ निष्ठा अपार आवश्यक ॥ ४२ ॥
अनागमज्ञ केवळ तार्किक। वादोन्मुख आणि चिकित्सक ॥
तयां स्वप्नींही ज्ञान सम्यक। शुद्ध आस्तिक पाहिजे ॥ ४३ ॥

ऐसे आम्ही चौघे सुबुद्ध । निघालों लावूं कांहीं शोध ॥
स्वबुद्धीनेंच व्हावा तो बोध । स्वतंत्र निर्वेधमानसें ॥ ४४ ॥

ऐसी इच्छा तिघांच्या अंतरीं । वनीं विचरतां स्वच्छंद परी ॥
भेटला मार्गांत एक वणजारी । प्रश्न तो करी आम्हांतें ॥ ४५ ॥

ऊन पडलें आहे प्रखर । प्रयाण किमर्थ आणि कुठवर ॥
चाललों तयास केलें प्रत्युत्तर । वनवनांतर धुंडाया ॥ ४६ ॥

पुसे आम्हास तो वणजारी । शोध कशाचा लावितां तरी ॥
आम्ही वदते जाहलों उत्तरीं । गुप्तार्थीं न करी परिस्फुटता ॥ ४७ ॥

पाहुनी तयांची धांवाधांव । वणजारीयाचा कळवळला जीव ॥
म्हणे वन दुर्गम नकळतां ठाव । स्वेच्छास्वभाव विचरूं नये ॥ ४८ ॥

रानींवनीं हिंडावयास । सवें घ्यावें वाटाडियास ॥
भर दुपारीं ऐसें साहस । करितां आयास किमर्थ ॥ ४९ ॥

नका सांगू गुप्तार्थ परी । बसा खा भाकर तुकडा तरी ॥
पाणी प्या जा तदनंतरी । राखा सबूरी अंतरीं ॥ ५० ॥

आला जरी इतुका काकुळती । आम्ही तैसेंच निघालों पुढती ॥
धिःकारिली तयाची विनंती । थकलों कीं अतीव मार्गांत ॥ ५१ ॥

आम्ही अवघेच बुद्धिमान । काढूं अपुला मार्ग शोधून ॥
वाटाडियाचें काय प्रयोजन । होता कीं अभिमान हा पोटीं ॥ ५२ ॥

परी तें रान अति विस्तीर्ण । विशालतुंग विटपीं विकीर्ण ॥
रिघे न जेथें सूर्यकिरण । मार्गक्रमण कैं तेथें ॥ ५३ ॥

होऊनियां दिशाभूल । भ्रमलों इतस्ततः निर्फल ॥
थोर दैवाचे तेणेंच हें स्थळ । मागुती निश्चल पावलों ॥ ५४ ॥

---

१ लावण्यासाठीं. २ वृक्षांहीं.

देवें लाविलें आलया वाटे । पुनश्च पूर्वील वणजारी भेटे ॥
म्हणे भरलां वाटतें अव्हांटें । चातुर्य आटे बुद्धीचें ॥ ५५ ॥

कार्य सान अथवा मोठें । मार्गी जावया लागे वोटें ॥
शोध न लागे रित्या पोटें । बुद्धीचे फाटे अफाट ॥ ५६ ॥

असल्यावीण ईश्वरी घाट । मार्गी होई न कोणाची गांठ ॥
देऊं नये अन्नासी पाठ । वाढिलें ताट डावलूं नये ॥ ५७ ॥

भाकरतुकडा देई कोण । घे त्या म्हणे तयाचें वचन ॥
मानावा पूर्ण शुभशकुन । कार्य निर्विघ्नकारक ॥ ५८ ॥

करा आतां अल्पाहार । धरा चित्तीं किंचित धीर ॥
परी त्यां रुचेना हा सुविचार । पुनश्च निराहार निघाले ॥ ५९ ॥

न लावितां शोध कांहीं । अन्नसेवन करणें नाहीं ॥
ऐसें वदून मग ते पाहीं । दुराग्रहीं नाडले ॥ ६० ॥

मज लागली होती भूक । तपेनें कोरड कंठास सोक ॥
वणजारियाचेंही प्रेम अलौकिक । वाटलें कवतुक तयाचें ॥ ६१ ॥

आम्ही विद्वान मोठे पढिक । दयामाया नाहीं ठाउक ॥
उष्ट्या हातें असतां धनिक । हांकिला न काक एकानें ॥ ६२ ॥

हा तो अविद्वान अनधिकारी । नीच वर्ण ज्ञात वणजारी ॥
परि स्वाभाविक प्रेम अंतरीं । भाजी भाकर खा म्हणे ॥ ६३ ॥

ऐसें लाभावीण प्रेम । करी जो तोच सुबुद्ध परम ॥
तयाचा आदर हाची अप्रतिम । विद्योपक्रम वाटला ॥ ६४ ॥

म्हणोनियां आदरपूर्वक । वणजारियानें दिधलेला एक ॥
चतकोर खावोनि प्यालों मी उदक । तों काय कौतुक वर्तलें ॥ ६५ ॥

१ आडमार्गाला. २ ढकलून देऊं नये. ३ कावळा.

गुरुतान आले अकल्पित । म्हणती वादावादी किमर्थ ॥
मग निवेदिला इत्थंभूत । वर्तला वृत्तांत तयांस ॥ ६६ ॥
येतां काय मजसमेत । लावूनि देतों शोध त्वरित ॥
परी जो आदरिल मद्वचनार्थ । तयाचाच स्वार्थ फळेल ॥ ६७ ॥
इतरांनीं तें नाहीं मानिलें । परी म्यां शिरसा मान्य केलें ॥
इतर सर्व निघून गेले । मग मज घेतलें गुरुरायें ॥ ६८ ॥
नेलें एका विहिरीवर । दोन्ही पायांस बांधिला दोर ॥
वरती पाय खालतीं शिर । पाण्यावरोवर सोडिला ॥ ६९ ॥
पाण्यास पोहोंचू नयेत हात । पाणीही जाऊं नये मुखांत ॥
ऐसें मज अलगत लोंबत । सोडिलें विहिरींत गुरुरायें ॥ ७० ॥
झाड होतें कांठीं एक । तयास दोरीचें दुसरें टोंक ॥
बांधून गेले गुरुराय निःशंक । कोणा न ठाऊक कोठें तें ॥ ७१ ॥
घटका गेल्या दहा बारा । परतले मग ते माघारा ॥
काढोनि बाहेर मज झरझरा । पुसलें कीं बरा आहेस तूं ॥ ७२ ॥
मग म्यां दिधलें प्रत्युत्तर । होतों अत्यंत आनंदनिर्भर ॥
भोगिलें जें सौख्य अपार । तें काय पामर मी वानूं ॥ ७३ ॥
परिसतां हें माझें वचन । जाहले गुरुराय सुखसंपन्न ॥
निजहस्त अंगावरी फिरवून । जवळी रहावून घेतलें ॥ ७४ ॥
सांगतां येती प्रेमाचे उमाळे । मग मज नेलें गुरुनें शाळे ॥
पक्षिणी पिलियां पांखी कवळे । मजलागीं कळवळे ते रीतीं ॥ ७५ ॥
काय गोड गुरूची शाळा । सुटला जनक जननीचा ळळा ॥
तुटली मोह ममतेची शृंखळा ॥ लाधलों अवलीळा मुक्तता ॥ ७६ ॥
सुटला दुराशापाश सगळा । भंगली प्रवृत्ति-प्रतिबंध-अर्गळा ॥
वाटे या गुरूच्या गळ्यांतचि गळा । घालूनि त्यां डोळां वसवावें ॥७७॥

तयाचें प्रतिबिंब नसतां डोळां । तो काय शुद्ध पांसाचा गोळा ॥
अथवा त्याहून बरा मी आंधळा । ऐसी ही शाळा मज झाली ॥७८॥

लागतां या शाळेस पाय । कोण हतभागी माघारा जाय ॥
माझें घरदार बापमाय । सर्वचि गुरुराय जाहले ॥ ७९ ॥

इतर इंद्रियें सहितमना । सोडुनियां निजस्थाना ॥
ठेलीं घेऊनि एका नयना । ध्यानावधानाकारणें ॥ ८० ॥

गुरु एकदृष्टीचें ध्यान । इतर सर्व गुरुसमान ॥
नाहीं गुरुविण दुजें आन । अनन्य अवधान या नांव ॥ ८१ ॥

करितां गुरुस्वरूपध्यान । कुंठित होय बुद्धिमन ॥
म्हणोनि शेवटीं करावें नमन । निःशब्द मौन धरोनियां ॥ ८२ ॥

नातो ज्ञानार्थ गुरु करावे । शून्य सदुपदेशाच्या नांवें ॥
दक्षिणा देतां वित्ता मुकावें । अनुतापा पावावें परिणामीं ॥ ८३ ॥

गुह्य ज्ञानाची केवळ चावटी । मिरवे प्रांजळपणाची दिवटी ॥
पाजिली दंभें जया बाळगुटी । देईल शेवटीं तो काय ॥ ८४ ॥

बाह्यात्कारीं मोठा सोंवळा । अंतर्यामीं नाहीं कोंवळा ॥
प्रतीतीच्या नांवें आंवळा । तयाची शाळा निकामी ॥ ८५ ॥

जेथें शब्दज्ञानाला ऊत । ब्रह्मज्ञानाचीं नाहीं मचीत ॥
स्वमुखें गुरु निज गरिमा गात । शिष्या निजहित तें कैचें ॥ ८६ ॥

जयाचा बोल झोंबेना वर्मीं । साक्षी न पटे अंतर्यामीं ॥
तयाचें गुरुत्व काय कामीं । व्यर्थ रिकामीं वटवट ती ॥ ८७ ॥

असो ऐसी दिधली सेवा । दाविला मज ज्ञानाचा ठेवा ॥
लागला न मज शोध करावा । अर्थ गिंवसावा किंचितही ॥ ८८ ॥

अर्थजात स्वयें प्रगटलें । अभ्यासीं हातीं चढलें ॥
गुरुकृपेचें ऐसें केलें । शोधणें ठेलें ठायींच ॥ ८९ ॥

खालीं डोकें वरती पाय । टांगी उफराटें जें गुरुराय ॥
तें मज आनंद कैसा होय । समर्थ गुरुपाय जाणाया ॥ ९० ॥

संतां घरची उलटीच खूण । हें तों अनुभवजन्य ज्ञान ॥
एथें निष्ठाच एक प्रमाण । एक साधन गुरुकृपा ॥ ९१ ॥

कर्मठास विधिनिषेधपण । ज्ञानीयातें ज्ञानाभिमान ॥
योगियातें दंभाचा शीण । विश्वासाविण चालेना ॥ ९२ ॥

पंडितांचे गर्वांध डोळे । अभिमानाचे प्रत्यक्ष पुतळे ॥
ज्ञानीया पाहून तयास पळे । संगें न मेळे तयाच्या ॥ ९३ ॥

ज्ञानी वदे माझियावीण । देव तरी दुसरा कोण ॥
मी तों स्वयेंच ज्ञानसंपन्न । चिद्घन परिपूर्ण तो मीच ॥ ९४ ॥

भक्त स्वकीय भक्तिभावीं । ज्ञानाची ती प्रौढी न मिरवी ॥
तनुमनधनेसी स्वामीसीं गोंवी । स्वामीस निरवी सर्वस्व ॥ ९५ ॥

ही एक माझी कर्तबगारी । ही मत्सामर्थ्याची थोरी ॥
ही मद्बुद्धिवैभवाची उजेरी । नसे ही फुंजेरी तयातें ॥ ९६ ॥

जें जें घडे तें देव घडवी । तोच उतरवी तोच चढवी ॥
तोच लढे अथवा लढवी । कर्ता करवी तो एक ॥ ९७ ॥

कर्तृत्व ठेवून स्वामीचे माथां । स्वयें स्वीकारी अति नम्रता ॥
भक्ता सदैव देवतंत्रता । नाहीं स्वतंत्रता तयातें ॥ ९८ ॥

असो हे जे चौघे प्रबुद्ध । करीत होते कशाचा शोध ॥
हें तो येथवर राहिलें मुग्ध । परिसावा उद्बोध तयाचा ॥ ९९ ॥

हे सर्व कर्मठघनापाठी । विद्वत्तेची घमेंडी पोटीं ॥
करितां शब्दज्ञानाची चावटी । निघाली गोठी देवाची ॥ १०० ॥

---

१ प्रभाव. २ फुगारा, तांठा. ३ देवाधीनपणा. ४ खुलासा, स्पष्टीकरण

निजज्ञानाचिया नेटेपाटें । देव कैसा कोठें राहटे ॥
आपणा कैसा कवण्या वाटे । युक्तीनें भेटे हा हेत ॥ १०१ ॥
प्रबुद्धांमाजी श्रीसाई एक । मूर्तिमंत वैराग्यविवेक ॥
परब्रह्म स्वयें देख । तें कां हा अविवेक आलंबिती ॥ १०२ ॥
ऐसी श्रोते घेतील आशंका । तरी हा लोकसंग्रह देखा ॥
साईसमर्था भक्तोद्धारका । हीनत्व हें कां आणील ॥ १०३ ॥
स्वयें आपण असतां अवतारी । वंद्य मानूनिया वणजारी ॥
अन्नब्रह्म निज निर्धारी । सेवूनि थोरी गाइली ॥ १०४ ॥
तैसेंच तया जो अवमानी । तयाची कैसी होते हानी ॥
गाइली ही प्रबुद्धांची काहणी । कोणी न ज्ञानी गुरुविण ॥ १०५ ॥
मातृपित्राचार्यानुशासन । यांवीण अशक्य धर्मज्ञान ॥
तेंही सर्व अध्ययनाधीन । विना अनुष्ठान तें व्यर्थ ॥ १०६ ॥
संपादूं लागे आशिर्वचन । होई मातृवान पितृवान ॥
आणिक होई आचार्यवान । श्रुतिवचन विश्रुत हें ॥ १०७ ॥
या त्रयीचें जें अनुसंधान । अथवा ईज्याध्ययनदान ॥
जन्म मृत्यूचें व्हावया उल्लंघन । परम साधन हें एक ॥१०८॥
हीं सर्व चित्तशुद्धीचीं साधनें । यांवीण आत्मवस्तूचें नाणें ॥
हातीं न चढे ऐसें तें जिणें । व्यर्थ येणें जन्मास ॥ १०९ ॥
शरीर इंद्रिय आणि मन । बुद्धीही नेणे करूं आकलन ॥
ऐसें जें आत्मस्वरूप गहन । तयाचें दर्शन गुरुकृपें ॥ ११० ॥
जेथें प्रत्यक्ष वा अनुमान । उभय प्रमाणें अप्रमाण ॥
तया करतलगत आमलका[1] समान । कोण गुरुवीण दावील ॥१११॥
धर्म अर्थ तिसरा काम । प्राप्त होतीच करितां श्रम ॥
परी चवथा पुरुषार्थ परम । गुरुविण श्रम सर्वथा ॥ ११२ ॥

१ आंवळा.

या शिर्डी संताचिया दरबारा । जोशीही येती देती मुजरा ॥
सांगती नरदेहाचा होरा । भविष्य थोरां मोठ्यांस ॥ ११३ ॥
धन-धान्य वैभव भोगी । राजे रजवाडे आणि जोगी ॥
तडी तापडी रागी विरागी । दर्शनालागीं उत्कंठित ॥ ११४ ॥
जपी तपी व्रती संन्यासी । यात्रेकरू क्षेत्रनिवासी ॥
गायक नर्तक परिवारेंसी । येत शिर्डीसी दर्शना ॥ ११५ ॥
महारही येई जोहारा । या श्रीसाईचिया दरबारा ॥
म्हणे हाचि एक माय बाप खरा । चुकविल येरझारा जन्माच्या ॥११६॥
आत्मलिंग जयाचे गळां । विभूति फांसिली जयाचे भाळा ॥
जयाचा कोरान्न भिक्षेवर डोळा । पहावा सोहळा जंगमाचा ॥ ११७ ॥
मानभाव गारोडी येती । गोंधळी प्रेमें गोंधळ घालिती ॥
भवानीचा जोगवा मागती । अति प्रीती बाबांसी ॥ ११८ ॥
अंध पंगू कानफाटे । जोगी नानक भाट दिवटे ॥
समर्थ साईच्यां भक्तिपेठे । धांवती मोठे प्रेमानें ॥ ११९ ॥
डुगडुगे सरोदे पांगूळ । कोल्हाटिणीही करिती खेळ ॥
तेथेंच हा वणजारी प्रेमळ । आला कीं वेळ साधुनी ॥ १२० ॥
धन्य धन्य साईची आकृती । वैराग्याची ओतीव मूर्ती ॥
निर्विषय निःसंग निस्वार्थी । भक्त भावार्थी अनुपम्य ॥ १२१ ॥
असो आतां पूर्वानुसंधान । मुख्य कथेचा धागा धरून ॥
सुरू करूं कीं आख्यान । श्रोतीं अवधान देईजे ॥ १२२ ॥
बाबा न स्वयें उपासी राहत । कोणासही न राहूं देत ॥
उपोषितांचें न स्वस्थ चित्त । कैंचा परमार्थ तयांचा ॥ १२३ ॥
देव न लाधे रित्या पोटीं । आधीं आत्म्याची करा संतुष्टी ॥
या उपदेशाची आणिक गोष्टी । श्रोतयांसाठीं निवेदितों ॥ १२४ ॥

भुकेनें ऐन दुपारचे वक्तीं । खालची माती जैं होते वरती ॥
अन्नब्रह्मपदाभिव्यक्ति । उपजते वृत्तीस निवाऱ्या ॥ १२५ ॥

अति दुर्धर ऐसी वेळा । तोंडी न देतां अन्नाचा गोळा ॥
हीनदीन इंद्रियमेळा । विसरे निजकळा सर्वस्वी ॥ १२६ ॥

पोटीं नसतां अन्नाचा ओलावा । देव कवण्या डोळां पहावा ॥
कवण्या वाचे महिमा वर्णावा । कर्णें परिसावा तो कवण्या ॥ १२७ ॥

सारांष सकल इंद्रियां शक्ती । तरीच घडे देवाची भक्ती ॥
जरी अन्नावीण क्षीणत्वा येती । तरी त्यां न गती परमार्थीं ॥ १२८ ॥

अति भोजन तेंही न हितकर । मितभोजन खरें सुखकर ॥
उपवास अतिरेक भयंकर । असुख निरंतर भोगवी ॥ १२९ ॥

एकदां एक बाई शिर्डीस । पत्र घेऊन केळकरांस ॥
आली साईचे दर्शनास । परम उल्लास मानसीं ॥ १३० ॥

महाराजांचे पायापाशीं । वसावें तीन दिवस उपवासी ॥
बाईनें निर्धारिलें मानसीं । तिचें तिजपाशींच राहिलें ॥ १३१ ॥

बावांच्या नित्य क्रमानुसार । परमार्थाचा करितां विचार ॥
आधीं कंवरेस बांधावी भाकर । बाईचा निर्धार उफराटा ॥ १३२ ॥

जया मनीं देव गिंवसावा । भाकर तुकडा आधीं खावा ॥
असल्यावीण समाधान जीवा । कैसेनी देवा उमगावें ॥ १३३ ॥

भुकेल्या पोटीं देव सांपडे । हें तो कल्पांतींही न घडे ॥
उपास तापास योचें सांकडें । चालेना इकडे साईसी ॥ १३४ ॥

अंतर्साक्षी महाराजांसी ॥ होतेंच हें ठावें पूर्वील दिवसीं ॥
आधींच दादा केळकरापाशीं । होतें कीं भाषित झालेलें ॥ १३५ ॥

---

१ कै० वा० दामोदर वामन ऊर्फ दादा केळकरांस

आतां या शिमग्याच्या सणाशीं । राहतील का माझीं पोरें उपाशी ॥
कसा मी राहूं देईन त्यांसीं । मग मी कशासीं पाहिजे ॥ १३६ ॥
साईमुखावाटें बाहेर । पडलें नाहींत जों हे उद्गार ॥
तोंच दुसरे दिवशीं तयार । पातली शिरडीवर ही बाई ॥ १३७ ॥
उपनांव बाईचें गोखले । उक्त प्रकारें मनीं निर्धारिलें ॥
दादांच्या येथेंच गाठोडें ठाविलें । पत्र दिधलें तयांस ॥ १३८ ॥
कानीटकर काशीबाई । आप्तसंबंधें पत्र देई ॥
विनवी दादांस लावाया सोई । दर्शनार्थ साईबाबांच्या ॥ १३९ ॥
बाई शिरडीस यऊन पातल्या । तात्काळ बाबांच्या दर्शना गेल्या ॥
दर्शन होऊन क्षणभर बसल्या । तोंच तयांस उपदेश ॥ १४० ॥
कोणाचें काय अंतर्गत । साईनाथ जाणे समस्त ॥
ऐसें न कांहीं भूमंडळांत । नसे जें अवगत तयांस ॥ १४१ ॥
'अन्नमन्नाद[1]' विष्णुस्वरूप । उपास तापास आणि निर्लेप ॥
निराहार आणि निरांप[2] । किमर्थ हा व्याप वाडगा ॥ १४२ ॥
काय अवश्यकता आ त्याला । उपास तापास करावयाला ॥
बाबा आपण होऊन तियेला । ऐसिया बोला बोलले ॥ १४३ ॥
जा त्या दादाभटाचे[3] घरीं । खुशाल पुरणाच्या पोळ्या करी ॥
तयाच्या पोरांबाळांस चारी । स्वयेंहि पोट भरी तूं खाई ॥ १४४ ॥
नवल तो शिमग्यासारिखा सण । बाई येण्याचा योगही विलक्षण ॥
दादांचें कुटुंबही तत्क्षण । अस्पर्श होऊन बसलेलें ॥ १४५ ॥
विराली उपोषणाची उकळी । स्वयंपाकाची आली पाळी ॥
मग तीं परम प्रेम:समेळीं । आज्ञा पाळीं बाबांची ॥ १४६ ॥

१ अन्न आणि अन्न खाणारा २ पाणी न पितां राहणारा.
३ दादा केळकरांचे.

चरण बाबांचे अभिवंदून । दादांचिया घरीं जाऊन ॥
पुरणपोळीचें जेवण करून । सर्वांस वाढून जेवली ॥ १४७ ॥

काय आख्यायिका ही सुंदर । काय अंतर्गत अर्थोपसंहार ॥
व्हावें ऐसें गुरुवचनीं स्थीर । नाहीं मग उशीर उद्धारा ॥ १४८ ॥

ऐशीच एक आणिक कथा । आठवली होती साई समर्था ॥
कथिली प्रेमें भक्तांस समस्तां । सादर श्रोतां परिसिजे ॥ १४९ ॥

जया मनीं परमार्थीं आस । तयानें केले पाहिजे सायास ॥
करूं लागे दृढ अभ्यास । व्हावें साहसही स्वल्प ॥ १५० ॥

ऐसें हें सत्कथामृत चरणतीर्थ । सेवावें नित्य कल्याणार्थ ॥
होतां संतचरणीं विनीत । होईल पुनीत अंतर ॥ १५१ ॥

एकदां मी लहान असतां । फडका बांधोन पोटाभोंवता ॥
धंदा मिळावा निर्वाहापुरता । आणूनि चित्ता निघालों ॥ १५२ ॥

चालतां चालतां बीडगांवा । आलों तेथें घेतला विसावा ॥
फकीराचा माझ्या न्याराच कावा । आनंद जीवा वाटला ॥ १५३ ॥

तिकडे मिळालें जरीचें काम । मीही खपलों अविश्रम ॥
फळले ते माझे सकळ श्रम । पहा पराक्रम फकीराचा ॥ १५४ ॥

माझ्या आधींच लाविलेले । हुपार हुपार नावाजलेले ॥
चार पोरांहीं ही काम केलें । तेही मापिलें ते समयीं ॥ १५५ ॥

एकानें पन्नास रुपयांचें केलें । शंभराचें दुजियाचें झालें ॥
तिजियाचें दीडशांचें भरलें । माझें सर्वांहूनी द्विगुणीत ॥ १५६ ॥

पाहुनियां माझी हुपारी । धनी बहु आनंदला अंतरीं ॥
बहुतांपरी मज गौरव करी । प्रेम भारी मजवरी ॥ १५७ ॥

१ निराळाच २ मतलब, संकल्प

मज तयानें पोषाख दिधला । डोईस पागोटें अंगावर शेला ॥
परी मी तो बांधून ठेविला । जैसा दिधला तैसाच ॥ १५८ ॥

कोणाचें देणें कोणास पुरतें । कितीही द्यावें सदा अपुरतें ॥
माझें सरकार जें देऊं सरतें । न सरतें तें कल्पांतीं ॥ १५९ ॥

देणें एक माझ्या सरकारचें । तयासी तुळे काय तें इतरांचें ॥
अमर्यादास मर्यादेचें । भूषण कैचें असावें ॥ १६० ॥

माझें सरकार न्या न्या वदे । मजलाच जो तो म्हणे दे दे ॥
कोणी न माझ्या बोलासीं लक्ष दे । एकही सुधें ऐकेना ॥ १६१ ॥

उतून चालिला आहे खजिना । एकही कोणी गाड्या आणिना ॥
खणा म्हणतां कोणीही खणीना । प्रयत्न कोणा करवेना ॥ १६२ ॥

मी म्हणे तो पैका खणावा । गाड्यावारीं लुटून न्यावा ॥
खरा माईचा पूत असावा । तेणेंच भरावा भांडार ॥ १६३ ॥

आमुची तरी काय गती । मातीची होऊन जाईल माती ॥
वारा जाईल वाऱ्याच्या संगती । येईना मागुती हा वेळ ॥ १६४ ॥

असो माझिया फकिराची कळा । माझिया भगवानाची लीळा ॥
माझिया सरकाराचा ताळा । लयीं निराळा न्याराच ॥ १६५ ॥

मीही कधींच कोठें जातों । कोण्याही ठायीं जाऊन बसतों ॥
परी हा जीव मायेंत घोटाळतो । गोते खातो अनिवार ॥ १६६ ॥

माया आहे फार कठिण । तिणें केलों मी हीन दीन ॥
माझिया माणसांची रात्रंदिन । घोंकणी करून असतों मी ॥ १६७ ॥

जो जो जैसें जैसें करील । तो तो तैसें तैसें भरील ॥
ध्यानांत ठेवी जो माझे बोल । सौख्य अमोल पावेल तो ॥ १६८ ॥

---

१ परमेश्वर. २ देऊं लागतें. ३ संपत नाहीं.

हेमाड साईसीं शरण । अपूर्व हें कथा निरूपण ॥
साईच स्वयें करी जें आपण । माझें मीपण फिकें तें ॥ १६९ ॥

तोच या कथेचा निवेदिता । तोच वाचिता तोच परिसता ॥
तोच लिहिता आणि लिहविता । अर्थबोधकताही तोच ॥ १७० ॥

साईच स्वयें नटे ही कथा । तोच इये कथेची रुचिरता ॥
तोच होई श्रोता वक्ता । स्वानंदभोक्ताही तोच ॥ १७१ ॥

मग ऐसिया श्रवणाची गोडी । ही काय थोडी परमार्थ जोडी ॥
भक्त सभाग्य जे हे सुख परवडी । आनंद निरवडी भोगिती ॥१७२॥

आतां पुढील अध्यायाचें सार । साईच्या उदीचा महिमा अपार ॥
श्रोते सज्जन पसरितों पदर । होऊनि सादर परिसावा ॥ १७३ ॥

हेमाड वदे अति विनीतता । कृपा उपजली साई समर्था ॥
त्यांनींच वदविलें निजसच्चरिता । कथा रसभरिता अपूर्व ॥१७४॥

इति श्री संतसज्जनप्रेरिते । भक्त हेमाडपंतविरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । गुरुमहिमा वर्णनं नाम
द्वात्रिंशत्तमोऽध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

सालमजकुरीं श्री साईबाबांच्या पुण्यतिथी निमित्तें
शिर्डी येथील कार्यक्रम खालील प्रमाणें ठरला आहे.

आश्विन शुद्ध १० रविवार ता. २७ सप्टेंबर १९२५

| | |
|---|---|
| रुद्राभिषेक<br>भिक्षा<br>कीर्तन | सकाळीं |
| आरती<br>आराधन विधि<br>भंडारा | दुपारीं |
| रथाची मिरवणूक | रात्रीं |

आश्विन शुद्ध ११ सोमवार ता. २८ सप्टेंबर १९२५

सायंकाळीं कीर्तन
रात्रीं चावडी

आश्विन शुद्ध १२ मंगळवार ता. २९ सप्टेंबर १९२५

सकाळीं काला नंतर आरती

सदर्हू कार्यासाठीं कोणास कांहीं पाठवावयाचें असल्यास तें रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर ५ सेंट मार्टिन्सरोड वांद्रें बी बी. सी. आय. रेल्वे या पत्यावर पाठवावें.


## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी **दासगणू** महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.